मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले





● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४२ ■ शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# राजकारणातील दादामाणूस गेला

## अवघा महाराष्ट्र हळहळला



**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** दादा' नावाचा एक वादळ शमल बारामतीच्या मातीतच ओढवून घेतला शेवटचा श्वास आजची सकाळ महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः बारामतीकरांसाठी काळीकुट्ट ठरली. अजित दादांना ज्या मातीने राजकारणाचे धडे दिले, ज्या बारामतीमध्ये त्यांचा जन्म झाला त्या मातीतच 28 जानेवारी 2026ची सकाळ महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः बारामतीकरांसाठी काळीकुट्ट ठरली. ज्या मातीने त्यांना राजकारणाचे धडे दिले, ज्या बारामतीने त्यांना ‘दादा’ बनवले, त्याच बारामतीच्या आकाशात अजित पवारांच्या आयुष्याचा सूर्य अनपेक्षितपणे अस्त पावला. व्हीएसआर एव्हिएशनच्या विमानाच्या अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे निधन झाले आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगते पर्व शांत झाले.

मात्र त्यांचे राज्याचे मुख्यमंत्री बनण्याचे स्वप्न मात्र अधुरे राहिले. आज सकाळी ही बातमी राज्यभर पसरली परंतु यावर कोणाचाही विश्वास बसत नव्हता. अखेर ती बातमी खरी ठरली. दादांच्या जाण्याने महाराष्ट्र पोरका झाला आहे. त्याचप्रमाणे पवार घराण्याचे व बारामतीकरांचे तसेच राज्याचे ही कधीही भरून न येणारे नुकसान झाले. दादा गेल्याची बातमी समजताच राज्यभर राजकीय नेतेमंडळींनी व सर्व स्तरातून या बातमीने शोककळा पसरली आहे,. त्यांच्या जाण्याने राज्यात तीन दिवसांचा दुखवटा पाळला जाणार असला तरी त्यांच्या सारखा कणखर नेता पुन्हा होणार नाही. या सर्व नेत्यांच्या अकाली निधनाने त्या त्या वेळी अख्या महाराष्ट्राला धक्का बसला आहे.


2006 मध्ये प्रमोद महाजन यांचे घातपात झाल्याने निधन झाले होते. त्यावेळी ते 56 वर्षाचे होते, 2012 मध्ये विलासराव देशमुख





यांचे अवयव निकामी झाल्याने निधन झाले होते. त्यावेळी ते 67 वर्षाचे होते, 2014 मध्ये विलासरावांचे मित्र गोपीनाथ मुंढे यांचे दिल्लीत कार अपघातात निधन झाले होते. त्यावेळी त्यांचे वय 64 होते, 2015 मध्ये आर. आर. पाटील यांचे कॅन्सरमुळे दुःखद निधन झाले होते. त्यावेळी ते फक्त 58 वर्षाचे होते, आणि आता अजित दादा पवार यांचे विमान अपघातात वयाच्या 66 व्या वर्षीच निधन झालेया सर्व नेत्यांची गरज आणि कमी अजूनही महाराष्ट्राला जाणवते. यांच्या नंतर 28 जानेवारी2026 रोजी अजित दादा सारखे जनमानसातील नेतेआजपर्यंत महाराष्ट्राने गमावले आहेत. अजित पवार म्हणजे शिस्त आणि गतीमान प्रशासन. महाराष्ट्राच्या मंत्रालयात जेव्हा कर्मचारी यायचे, त्याच्या आधीच फायलींचा निपटा करून मोकळे होणारे मंत्री म्हणजे अजितदादा. पहाटे 6 वाजता मीटिंग घेणारा, स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध असलेला आणि शब्दाला पक्का असलेला नेता म्हणून त्यांची ओळख होती. “काम होणार असेल तर होईल, नाहीतर नाही,” हे तोंडावर सांगणाऱ्या त्यांच्या स्वभावामुळे ते लोकप्रियही होते आणि वादातही राहिले.

प्रशासनावर त्यांची असलेली पकड त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावी लागे. अहमदनगरच्या देवळाली प्रवरा येथे जन्मलेले अजित अनंतराव पवार हे काका शरद पवारांच्या बोटाला धरून राजकारणात आले, पण त्यांनी स्वतःची अशी एक वेगळी ‘स्टाईल’ निर्माण केली. 1991 मध्ये ते पहिल्यांदा बारामतीतून खासदार झाले, पण दिल्लीपेक्षा त्यांना महाराष्ट्राचं राजकारण जास्त भावले. सहकार क्षेत्र, साखर कारखाने आणि शिक्षण संस्थांच्या माध्यमातून त्यांनी बारामतीचा कायापालट केला. काकांचा वारसा चालवतानाच, “मला माझा स्वतःचा रस्ता तयार करायचा आहे,” ही महत्त्वाकांक्षा त्यांच्यात नेहमीच धगधगत होती. बंड आणि सत्ता अजितदादांच्या राजकीय प्रवासात अनेक चढउतार आले. सिंचन घोटाळ्याचे आरोप असो किंवा धरणाबद्दलचे ते वादग्रस्त विधान, दादा अनेकदा अडचणीत आले. पण प्रत्येक वेळी ते फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेत राहिले. 2012 मध्ये उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणे असो, किंवा 2021 मध्ये पहाटेचा शपथविधी आणि 2023 मधील राष्ट्रवादीतील मोठी फूटपडली अजितदादांनी नेहमीच अनपेक्षित चाली खेळल्या. सत्तेत असो वा विरोधात, ‘दादा’ हे नाव नेहमीच केंद्रस्थानी राहिले. काळाचा महिमा बघा, ज्या बारामतीवर त्यांनी अपार प्रेम केले, तिथेच लँडिंग करताना त्यांच्या विमानाला अपघात झाला. व्हीएसआर व्हेंचर्सच्या विमानांच्या सुरक्षिततेचा इतिहास आधीच संशयास्पद होता (2023 मध्ये मुंबईत याच कंपनीच्या विमानाचा अपघात







झाला होता), आणि आज त्याच कंपनीच्या लियरजेट 45 विमानाने महाराष्ट्राचा एक खंबीर नेता हिरावून नेला. अजित पवार हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते एक ‘डॅशिंग’ व्यक्तिमत्व होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न येणारी आहे. एक रोखठोक, स्पष्टवक्ता आणि कामाचा धडाका लावणारं ‘वादळ’ आज कायमचं शांत झालं आहे.

त्यांना उरण तालुका मराठी पत्रकार संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.






# जोगेश्वरीत ‘स्टॅन्स अराईज’ प्रकल्पाचे भव्य भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** जोगेश्वरी (पूर्व) येथील जनता कॉलनी, गांधी नगर परिसरात STANS BUILD-TECH प्रस्तुत स्टॅन्स अराईज या बहुप्रतिक्षित निवासी प्रकल्पाचा भव्य भूमिपूजन सोहळा सिद्ध गुरु एकता सेवा संघ (संचालित) व सिद्ध गुरु एकता (SRA) सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांच्या माध्यमातून सोमवार, दिनांक 26 जानेवारी 2026 रोजी, प्रजासत्ताक दिनाच्या पावन पर्वावर अत्यंत उत्साहात व मंगल वातावरणात पार पडला.

या सोहळ्याला सुमारे 1500 ते 2000 नागरिकांनी उपस्थिती लावली. मान्यवर पाहुणे, स्थानिक रहिवासी, महिला-भगिनी, सामाजिक कार्यकर्ते तसेच प्रकल्पाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय ध्वजारोहणाने करण्यात आली. त्यानंतर प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत सर्व उपस्थितांनी राष्ट्रगीताला मानवंदना दिली.

यानंतर पारंपरिक विधी, वैदिक मंत्रोच्चार व विधिवत पूजन करून प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला अधिकृत प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून स्टॅन्स अराईज प्रकल्पाच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा प्रकल्प जोगेश्वरी (पूर्व) परिसराच्या सर्वांगीण विकासात




महत्त्वाची भूमिका बजावेल, तसेच स्थानिक नागरिकांच्या राहणीमानात सकारात्मक बदल घडवून आणेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

STANS BUILDTECH च्या वतीने बोलताना प्रकल्प प्रतिनिधींनी सांगितले की, स्टॅन्स अराईज हा प्रकल्प आधुनिक जीवनशैलीच्या गरजा लक्षात घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने उभारण्यात येत आहे. आधुनिक सुविधा, दर्जेदार बांधकाम, सुरक्षितता, योग्य नियोजन व ग्राहकाभिमुख दृष्टीकोन यांचा उत्कृष्ट संगम या प्रकल्पात पाहायला मिळेल. ग्राहकांचा विश्वास व समाधान हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या भूमिपूजन सोहळ्याचे खास आकर्षण म्हणजे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला हळदी-कुंकू समारंभ. परिसरातील अनेक महिला-भगिनींनी मोठ्या उत्साहात या कार्यक्रमात सहभाग घेतला. हळदी-कुंकू कार्यक्रमामुळे महिलांमध्ये आनंदाचे व भक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, सामाजिक सलोखा आणि सहभागाचे सुंदर चित्र या सोहळ्यात पाहायला मिळाले.भूमिपूजन सोहळ्यानंतर उपस्थित मान्यवर व नागरिकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, उत्साही व भक्तिभावपूर्ण वातावरणात पार पडला. या भव्य भूमिपूजन सोहळ्यामुळे जोगेश्वरी (पूर्व) परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा ठाम विश्वास उपस्थित नागरिकांनी व्यक्त केला.

# मेडिकव्हर हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी ७५ वर्षीय महिलेचे प्राणघातक संकट टाळले ; गुंतागुंतीच्या हर्नियावर केले यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** अनेक वर्षांपासून जटिल हर्नियामुळे त्रस्त असलेल्या ७५ वर्षीय महिलेला नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रियेनंतर नवे जीवन मिळाले आहे. वारंवार शस्त्रक्रिया करुनही बरी न होणारी ही हर्नियाची समस्या अखेर प्रगत उपचारांमुळे पूर्णपणे दूर करण्यात डॉक्टरांना यश आले आहे.

नवी मुंबईत राहणाऱ्या श्रीमती सुरेखा पाटील (नाव बदलले आहे) यांच्या पोटात मागील शस्त्रक्रियेच्या जागी मोठी सूज आढळून आली होती. ही सूज हळूहळू वाढत गेल्यामुळे त्यांना चालणे, बसणे तसेच दैनंदिन कामं करणे देखील अवघड झाले होते. याआधी तीन वेळा हर्नियाची शस्त्रक्रिया होऊनही सूज पुन्हा येत असल्याने त्या शारीरिक व मानसिकदृष्ट्या खूप खचून गेल्या होत्या.

वैद्यकिय तपासणीत पोटाच्या भिंतीत सुमारे १८ सेंटीमीटरचा मोठी गाठ आढळून आली. पोटातील काही अवयव बाहेरच्या दिशेने सरकले होते. या स्थितीमुळे भविष्यात गंभीर धोके निर्माण होऊ शकतात. रुग्णाचे वय आणि आजाराची तीव्रता लक्षात घेऊन डॉक्टरांनी त्वरित शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला.

मेडिकव्हर हॉस्पिटलमधील गॅस्ट्रो-इंटेस्टिनल (जीआय) आणि हर्निया शस्त्रक्रियेत तज्ज्ञ असलेल्या डॉ. नितीन तवटे, डॉ. चिराग वजा आणि डॉ. सारंग बाजपेयी यांच्या टीमने ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली.* या शस्त्रक्रियेत पोटातील सर्व अवयव त्यांच्या योग्य जागी बसवण्यात आले आणि पोटाची भिंत मजबूत करण्यात आली. भविष्यात हर्निया पुन्हा होऊ नये यासाठी विशेष जाळी देखील बसवण्यात आली.

डॉ. नितीन तवटे(गॅस्ट्रो-इंटेस्टिनल (जीआय) आणि हर्निया शस्त्रक्रिया सर्जन, मेडिकव्हर हॉस्पिटल) सांगतात की,* इन्सिजनल हर्निया म्हणजे आधी झालेल्या शस्त्रक्रियेच्या जागी पोटाच्या भिंतीतील



कमकुवत भागातून आतले अवयव बाहेर येणे. या रुग्णामध्ये हर्निया वारंवार होण्यामागे अनेक कारणे होती. यामध्ये पूर्वी झालेल्या अनेक शस्त्रक्रिया, वाढते वय, स्नायूंची बळकटी कमी होणे आणि उपचारांना झालेला विलंब यांचा समावेश होता. वारंवार होणाऱ्या हर्नियामध्ये केवळ साधी शस्त्रक्रिया पुरेशी ठरत नाही. हे प्रकरण अतिशय आव्हानात्मक होते, कारण पोटाची भिंत खूप कमजोर झाली होती आणि पोटातील अवयव हळूहळू बाहेरच्या दिशेने सरकले होते. आमचे मुख्य उद्दिष्ट हे सर्व अवयव सुरक्षितपणे पुन्हा पोटात बसवणे आणि पोटाच्या भिंतीला दीर्घकाळ टिकणारी मजबुती देणे हे होते.

डॉ. चिराग वाजा आणि डॉ. सारंग बाजपेयी ( जीआय आणि हर्निया सर्जन) सांगतात की,* पहिल्या टप्प्यात पोटाचे ताणलेले स्नायू सैल करण्यासाठी बोटॉक्स इंजेक्शन देण्यात आले. त्यामुळे पोटावरील ताण कमी झाला आणि पुढील शस्त्रक्रियेसाठी शरीर तयार झाले. दुसऱ्या टप्प्यात पोटाची पोकळी हळूहळू वाढवण्यात आली, जेणेकरून अवयवांवर अतिरिक्त दाब न पडता त्यांना सुरक्षितपणे आत बसवता येईल. शेवटच्या टप्प्यात पोटाच्या भिंतीची दुरुस्ती करण्यात आली. यासाठी मोठ्या आकाराची जाळी बसवण्यात आली, ज्यामुळे पोटाला दीर्घकालीन आधार मिळाला आणि हर्निया पुन्हा होण्याचा धोका कमी झाला. सुमारे चार तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आणि त्यानंतर रुग्णाची प्रकृती हळूहळू सुधारू लागली.

डॉ. तवटे पुढे सांगतात की,* शस्त्रक्रियेनंतर दुसऱ्याच दिवशी रुग्ण चालू लागल्या. काही दिवसांत त्यांना सामान्य आहार देण्यात आला आणि पाच दिवसांत त्यांना घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिरावली असून त्या हळूहळू दैनंदिन जीवनात परतत आहेत.हर्नियाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी रुग्णाला १ ते १.५ महिने पोटाला पट्टा वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

रुग्ण श्रीमती सुरेखा पाटील म्हणाल्या,* मी अनेक वर्षांपासून खूप त्रास सहन करत आहे. अनेक शस्त्रक्रिया करुनही पाहिजे तसा आराम मिळत नव्हता. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या प्रयत्नांनी मला पुन्हा सामान्य आयुष्य जगण्याची संधी दिली आणि मी त्यांचे मनापासून आभार मानते.

खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्रप्रमुख संदिप जोशी सांगतात की, वरील प्रकरणातून मेडिकव्हर रुग्णालय गुंतागुंतीच्या व वारंवार कराव्यात लागणाऱ्या शस्त्रक्रियेच्या समस्या तज्ज्ञांच्या एकत्रित प्रयत्नांनी यशस्वीपणे सोडवू शकते, हे स्पष्ट होते.अनुभवी डॉक्टर, आधुनिक सुविधा आणि योग्य नियोजनाच्या मदतीने अशा गुंतागुंतीच्या आजारांवरही यशस्वीपणे मात करता येते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

## रस्ते सुरक्षेसाठी महत्त्वाचे पाऊल, नवीन पनवेल (पळस्पे) वाहतूक शाखेतर्फे वैद्यकीय तपासणी शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** रस्ते अपघात रोखण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी वाहतूक व्यवस्थेशी संबंधित घटकांचे आरोग्य सुदृढ असणे अत्यंत आवश्यक आहे, या भूमिकेतून नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या वतीने वाहतूक पोलीस तसेच स्कूल बस चालक, वाहक व बस मालक यांच्यासाठी विशेष वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संस्था व डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल यांच्या सौजन्याने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.




या शिबिरामध्ये एकूण ३६ वाहतूक पोलीस अधिकारी व अंमलदार, तसेच ६५ स्कूल बस चालक, वाहक व बस मालक यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, दृष्टी तपासणी, हृदयविकारासंबंधी प्राथमिक चाचण्या तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. गरजेनुसार तज्ज्ञ डॉक्टरांनी योग्य वैद्यकीय सल्ला देत मोफत औषधांचे वितरणही केले. विशेषतः स्कूल बस चालक, वाहक व बस मालक यांची वैद्यकीय तपासणी करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. दृष्टीदोष, उच्च रक्तदाब, मधुमेह, थकवा किंवा अचानक उद्भवणारे आरोग्याचे त्रास हे अनेक अपघातांचे कारण ठरू शकतात. लहान विद्यार्थ्यांची वाहतूक ही अत्यंत जबाबदारीची बाब असल्याने चालकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सक्षम असणे आवश्यक आहे. बस मालकांची तपासणी केल्यामुळे वाहन व्यवस्थापन, सततचा ताण, दीर्घ कामाचे तास यांचा आरोग्यावर होणारा परिणामही वेळेत लक्षात येतो. त्यामुळे हे शिबिर केवळ तपासणीपुरते मर्यादित न राहता अपघात प्रतिबंध, शालेय वाहतुकीची सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारीचे भान निर्माण करणारे ठरले.वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी रस्त्यावर सातत्याने कर्तव्य बजावत असतात. उन्हाळा, पाऊस, वाहतूक कोंडी अशा प्रतिकूल परिस्थितीत काम करताना त्यांच्या आरोग्याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे पोलीस कर्मचारी व अधिकारी वर्गासाठी अशा शिबिरांचे आयोजन कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या संपूर्ण शिबिराचे नियोजन वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, सहाय्यक फौजदार किशोर लाड, तसेच पोलीस हवालदार संजय गावडे, जितेंद्र कदम व ज्ञानेश्वर वाघ* यांनी अत्यंत शिस्तबद्ध व सुयोग्य पद्धतीने केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी वाहतूक शाखेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता व समन्वय उल्लेखनीय ठरला. तसेच, सामाजिक बांधिलकी जपत सहकार्य करणाऱ्या भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संस्था आणि डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाचे योगदान मोलाचे असल्याचे यावेळी आवर्जून नमूद करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे रस्ते सुरक्षा अधिक बळकट होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## दिशा महिला मंच आयोजित ‘संक्रांत मेळावा २०२६’

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** दिशा कल्चरल इव्हेंट्स प्रस्तुत दिशा महिला मंच आयोजित ‘संक्रांत मेळावा २०२६’ हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात कामोठे येथे पार पडला. महिलांच्या सन्मानासाठी, आत्मसन्मानासाठी व सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कामोठे पोलीस ठाणेच्या विमल बिडवे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. साई द्वारका हॉस्पिटलचे डॉ. हेमंत पाटील तसेच धीरज स्नेह उपहारच्या संस्थापिका व समाजसेविका इंदू झा यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमास ॲड. रोहिणी साळे व डॉ. गणेश साळे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ॲड. रोहिणी साळे यांनी महिलांना मार्गदर्शन करत सांगितले की, भविष्यात महिलांसाठी आरोग्य शिबिरे व विविध समाजोपयोगी उपक्रम दिशा महिला मंचसोबत



संयुक्तपणे राबवण्यात येतील, असे आश्वासन दिले. या कार्यक्रमामध्ये महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ,खेळ पैठणीचा,लकी ड्रॉ,विविध मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे पती नसलेल्या (विधवा) महिलांसाठी विशेष हळदी-कुंकू समारंभ राबविण्यात आला. या संवेदनशील उपक्रमामुळे अनेक महिलांच्या चेहऱ्यावर समाधान व आत्मीयतेचा आनंद दिसून आला. यावेळी प्रमुख पाहुण्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी महिलांना स्वतःची काळजी, सुरक्षितता, आत्मभान आणि मानसिक सबलता याबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी दिशा महिला मंचच्या उपक्रमांचे मनःपूर्वक कौतुक केले.

या कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील यांच्या सुविद्य पत्नी मोहिनी पाटील, नगरसेविका स्नेहल ढमाले, नगरसेविका हेमलता गोवारी, नगरसेविका शिला भगत, नगरसेविका कुसुम म्हात्रे यांची उपस्थिती लाभली. यावेळी त्यांचा सन्मान देखील करण्यात आला.

सर्व मान्यवरांनी महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करून संस्थेला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयश्री राठोड, राजश्री थोरात, शुभांगी पाटील,जयदादा युवा मंचचे संस्थापक जय डिगोळे, एल.एम. इंटरनॅशनल प्रीस्कूलच्या संस्थापिका ललिता कनोजिया, विभावरी शिगवन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल डांगे यांनी केले.

तसेच मनीषा मोरे, वंदना पोपळकर, दीक्षा ढोणे, गीता कुडाळकर, वंदना वाघमोडे, करुणा कांबळे, शिल्पा म्हात्रे व संपूर्ण टीम यांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. महिलांनी पैठणी खेळाचा मनमुराद आनंद लुटला. यावेळी बंजारा आयुर्वेदिक हेअर ऑइल कडून महिलांना केसगळतीवर उपाय म्हणून आयुर्वेदिक हेअर ऑइल वाण स्वरूपात देण्यात आले.शुभांगी कलेक्शन कडून महिलांना आकर्षक गिफ्ट देण्यात आले. तसेच Sparkling Angels कडून महिलांना विविध ठिकाणच्या पिकनिक पॅकेजेसवर विशेष सवलती देण्यात आल्या. संस्थेच्या संस्थापक नीलम आंधळे यांनी सांगितले स्त्रीशक्तीच्या सन्मानासाठी आणि महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी दिशा महिला मंच नेहमीच कार्यरत राहील. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी सर्व मान्यवरांचे, प्रायोजकांचे, सहकार्य करणाऱ्या संस्था, टीम व उपस्थित महिलांचे मनःपूर्वक आभार मानले.

## जाहिर नोटिस

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46P5229 चे मालक कै.विश्वानाथ श्रीपाद शिंदे याचं दिनांक 27/08/2020 रोजी निधन झाले आहे.

मी
प्रविण विश्वानाथ शिंदे
मुकाम - घर नं. 33, ललिता निवास, पोदी नं -02,सेक्टर-16,नवी पनवेल, रायगड, महाराष्ट्र-410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

उत्तरआधिकारचे नाव-
प्रविण विश्वानाथ शिंदे.
मुकाम-घर नं-33,ललिता निवास, पोदी नं-02,सेक्टर -16,नवी पनवेल, रायगड, महाराष्ट्र -410206.

## जाहिर नोटिस

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BD5604 चे मालक कै.श्रीपत लक्ष्मण पाटील. याचं दिनांक 10/05/2021 रोजी निधन झाले आहे.

मी
जनाबाई श्रीपत पाटील.
मुकाम - श्रीपत पाटील. 187,नावडे, विठ्ठल मंदिर जवळ, वळवली पाले बुद्रुक, पडघे, रायगड, महाराष्ट्र, 410208.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

उत्तरआधिकारचे नाव-
जनाबाई श्रीपत पाटील.
मुकाम-श्रीपत पाटील, 187,नावडे, विठ्ठल मंदिर जवळ, वळवली, पाले बुद्रुक, पडघे, रायगड, महाराष्ट्र, 410208.

## लोकांची जाण असलेल्या उमेदवारांना पसंती; नेरे मतदार संघात भाजप महायुतीचा बोलबाला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक मंगळवार, दि. ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार असून, या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेरे जिल्हा परिषद गट तसेच नेरे आणि आदई पंचायत समिती गणांमध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांना नागरिकांचा उदंड व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत असून, विकासाच्या मुद्द्यावर आधारित ही निवडणूक होणार असल्याचा ठाम विश्वास मतदारांकडून व्यक्त होत आहे.



नेरे जिल्हा परिषद गटातून सामाजिक प्रश्नांची जाण असलेले आत्माराम बाळू भस्मा, नेरे पंचायत समिती गणातून वर्षा सचिन केवारे, तर आदई पंचायत समिती गणातून भूपेंद्र सदानंद पाटील हे कार्यक्षम, विकासाभिमुख व लोकाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांच्या कार्यकाळात करण्यात आलेली विविध विकासकामे ही त्यांची जमेची बाजू ठरत असून, तिन्ही उमेदवारांनी लोकांच्या दैनंदिन प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. या उमेदवारांचा दांडगा जनसंपर्क असून, नागरिकांच्या सुख-दुःखात प्रत्यक्ष सहभागी होणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जनसंपर्क मोहिमा, घरभेटी, बैठका व प्रचाराला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. विकासाभिमुख कामगिरीवर विश्वास व्यक्त करत ग्रामस्थ भाजप महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा देत आहेत.

याउलट विरोधी उमेदवारांनी जनतेच्या प्रश्नांकडे व विकासाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्याबाबत नाराजीचा सूर उमटताना दिसत आहे. विरोधकांचा दृष्टिकोन स्वतःपुरताच मर्यादित राहिल्याची भावना मतदारांमध्ये निर्माण झाली आहे. नेरे व आदई परिसरातील ग्रामस्थांनी “स्थिर नेतृत्व, पारदर्शक कारभार आणि सर्वांगीण विकास” या त्रिसूत्रीवर भाजप महायुतीच्या उमेदवारांना पसंती दिल्याचे स्पष्ट चित्र सध्या दिसून येत आहे. महिलावर्ग, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्येही भाजप महायुतीच्या उमेदवारांविषयी सकारात्मक वातावरण असून, सर्व स्तरांतून त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे लोकांची जाण असलेले, काम करण्याची सकारात्मक मानसिकता बाळगणारे भाजप महायुतीचे उमेदवार या निवडणुकीत घवघवीत यश संपादन करतील, असा ठाम विश्वास कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ नागरिकांकडून व्यक्त होत आहे. शेकापक्षात राहून विकासकामे होणार नाहीत याची जाणिव कार्यकर्त्यांना झाल्यामुळे या विभागातील शेकाप कार्यकर्त्यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेशही केला आहे. त्यामुळे भाजप महायुतीच्या उमेदवारांची आणखी ताकद वाढली आहे.

# पितृप्रेमाची 'रॉयल 'सलामी स्व.कृष्णा महादेव भोईर स्मृती चषकातून उलगडली संस्कारांची गाथा !

## २० गुणवंतांच्या शाही सन्मानाने उरण नगरी भारावली

## के. एम. भोईर मेमोरियल कप २०२६ दिमाखात साजरा

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** बाप नावाचा वटवृक्ष जेव्हा कोलमडतो तेव्हा त्याची सावली हरवते पण त्यांनी पेरलेली संस्काराची बीजे जन्मभर उबदार सावली देतात, त्याचाच प्रत्येक उरण च्या कोटगाव ग्राम सुधारणा मंडळाच्या मैदानावर आला. स्व.कृष्णा महादेव भोईर यांच्या पवित्र स्मृतीना उजाळा देण्यासाठी त्यांचे सुपुत्र या भव्य स्पर्धेचे आयोजक जितेश कृष्णा भोईर व स्वागतोत्सव जयेश कृष्णा भोईर यांनी २४ते २६ जानेवारी दरम्यान आयोजित केलेल्या स्मृती चषक २०२६ने रायगड, ठाणे आणि पनवेल परिसरातील क्रीडाप्रेमींची मने जिंकली आहेत. त्याचप्रमाणे सर्व खेळाडूंच्या मुखातून स्पर्धेबददल समाधानाचे आणि




आनंदी सुर ऐकावयास मिळत आहेत " अशी स्पर्धा आम्हाला दहा दशकानंतर एवढ्या सुनियोजित पध्दतीने हि स्पर्धा अनुभवास मिळाली ."

स्व. कृष्णा महादेव भोईर म्हणजे केवळ एक नाव नव्हे तर पारदर्शक व्यवहार, शुद्ध चारित्र, आणि निस्वार्थी मैत्रीचे नाते टिकवणारे ,एक प्रामाणिक व्यक्तिमत्व होते ,शांत स्वभाव सर्वांना आपलेसे करण्याची हातोटी आणि कुटुंबासाठी भरभक्कम आधार देणाऱे शिस्तप्रिय, मार्गदर्शक आज आपल्यात नसले तरी त्यांच्या मुलांनी त्यांच्या कष्टांचे पांग फेडण्यासाठी हा क्रीडा सोहळा आयोजित केला. आपल्या सुखी भविष्यासाठी वडिलांनी आयुष्यभर अपार कष्ट केले त्या कष्टाला दिलेली खेळाडू वृत्तीची मानवंदना पाहून संपूर्ण जिल्ह्याचे डोळे पाणावले आहेत. विशेष म्हणजे कोणत्याही स्वरूपात देणगी न घेता या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

विविध क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या २०रत्नांचा सन्मान करण्यात आला .यामध्ये रवी भोईर साहेब (लोकनेते), डॉ.नीलम पाटील (रसायनशास्त्र डॉक्टर रेट), सिद्धेश म्हात्रे (राष्ट्रीय क्रिकेटपटू), केदार भोईर (जिल्हास्तरीय क्रिकेटपटू) ,तृप्ती भोईर( पत्रकार व निवेदिका) नयन पाटील (द्रोणागिरी श्री गोल्ड मेडलिस्ट) ,पार्थ भोईर (नॅशनल चॅम्पियन), गौरी शिंदे( सायकॉलॉजिकल सायन्स ), कैलास पंडित (राघोबा देव गोविंदा पथक प्रशिक्षक) रोहन सोनकर वंशिका भोनगे, प्रीत पाटील, व्रिशांक जोशी (दहीहंडी खेळाडू) सिद्धार्थ पाटील (राज्यस्तरीय जलतरणपटू ) समाजसेवक राजेंद्र शिंदे ,दशरथ पाटील ,चंद्रकांत भोंबले, जितेंद्र भोईर ,भरत भोईर, शंकर भोईर, व उमेश भोईर.

या सोहळ्याला महाराष्ट्र राज्य दहीहंडी असोसिएशनचे अध्यक्ष बाळा पडेलकर,खजिनदार डेविड फर्नांडिस, प्रशिक्षक विवेक नाकती, महादेव बंडा (अखिल कराडी समाज महाराष्ट्र अध्यक्ष) विलास पाटील अखिल कराडी समाज महाराष्ट्र सचिव) कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज शिंदे ,भार्गव पाटील राष्ट्रवादी कॉंग्रेस आदी मान्यवरांची मांदियाळी ने व्यासपीठावर हजेरी लावून गेले.

सामन्यांच्या यशस्वीतेसाठी आर एस कोटगाव मित्र मंडळ, श्री राघोबादेव गोविंदा पथक कमिटी, के एम भोईर मित्रपरिवार ,फार्मस्टेड ग्रुप कोटगाव ग्रामस्थ आणि भोईर कुटुंब यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

१६संघाच्या चुरशीच्या लढतीत कुणाल दाते, नितेश पंडित आतिश पाटील, अविनाश डाकी, अमर भोईर आणि उल्हास कट्टा यांच्या पहाडी समालोचनाने मैदान-दुमदुमून गेले .एम.सी.ए रायगड असोसिएशनच्या सर्टिफाईड पंचांनी सामन्याचे पारदर्शक नियंत्रण केले ५०,०००आणि २५,००० यांच्या पारितोषिकांसह भव्य चषकांसह, सायकल, कुलर आणि स्पोर्ट शूज, सनग्लास गॉगल अशा बक्षिसांची लयलूट करण्यात आली. या स्पर्धेची संघ मालिका समिधा नागाव प्रथम क्रमांक व करंजा संघ द्वितीय क्रमांकाचे शिलेदार ठरले

बाप घराचा पाया असतो आई कळस असते .पाया दिसत नाही पण तो संपूर्ण घराचा भार पेलत असतो. स्व. कृष्णा भोईर पेललेला तो कुटुंबाचा भार आज जितेश आणि जयेश हे बंधू एकमेकांच्या सहकार्याने पेलत आहेत आणि वडिलांचा वारसा खऱ्या अर्थाने सार्थ ठरवत आहेत.

वडिलांच्या चरणी वाहिलेली ही 'स्मृती चषकाची फुले' आयुष्यभराची कृतज्ञता आहे. निरोप घेताना प्रत्येक उरण करांच्या ओठांवर एकच वाक्य असेल की पुन्हा "कृष्णा' बापासारखी सावली प्रत्येकाला लाभो.

---

## वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन -२०२६ पूर्वी CISF कडून युवकांसाठी भरती जनजागृती सत्राचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर :** कोस्टल सायक्लोथॉन २०२६ च्या पूर्वतयारीचा भाग म्हणून केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF) युनिट जेएनपीए शेवा यांच्या वतीने प्री-लाँच जनजागृती कार्यक्रमांतर्गत स्थानिक युवकांसाठी CAPFs विशेषतः CISF भरतीविषयक जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

दिनांक २२.०१.२०२६ रोजी यशवंतनगर, कोलाड (ता. रोहा) येथे सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण व स्थानिक युवकांना CISF मधील भरती प्रक्रिया, पात्रता निकष, शारीरिक चाचण्या (PET/PST), लेखी परीक्षा, वेतन व सेवा-सुविधा तसेच करिअरच्या संधींबाबत सविस्तर व अचूक माहिती देणे हा होता.

कार्यक्रमात CISF भरतीसंदर्भातील अधिकृत माहिती, पात्रतेचे निकष (वयोमर्यादा, उंची, धावण्याचे निकष), अर्ज प्रक्रिया तसेच SSC मार्फत होणाऱ्या भरतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच युवकांमध्ये देशसेवेची भावना जागृत करण्यासाठी प्रशिक्षण व प्रेरणादायी व्हिडिओंचे सादरीकरण करण्यात आले.




सदर जनजागृती सत्राचे मार्गदर्शन CISF युनिट जेएनपीए शेवा येथील निरीक्षक / कार्यकारी (INSP/Exe) श्री. कडम सतीश यांनी केले. या कार्यक्रमाला कोलाड गावाचे सरपंच श्री. राजेंद्र सागवेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

त्यांनी युवकांना अशा संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले व CISF च्या या उपक्रमाचे कौतुक केले.

हा उपक्रम कोस्टल सायक्लोथॉनपूर्वीच्या समुदायस्तरावरील सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला असून स्थानिक युवकांमध्ये CISF बद्दल सकारात्मक जागरूकता निर्माण करण्यात CISF युनिट जेएनपीए शेवा यांना यश आले आहे.

---

## जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक प्रचारात सुधाकर घारे आणि नितीन सावंत यांची आघाडी; थोरवेंसमोर कर्जतमध्ये घारेंचे आव्हान कायम

### जिल्हा परिषद- पंचायत समिती निवडणूकीत परिवर्तन विकास आघाडीची मोर्चेबांधणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुक प्रचाराला वेग आला असून कर्जत खालापूरात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी प्रचारात आता आघाडी घेतली आहे. त्यामुळे आमदार महेंद्र थोरवे यांच्यासमोर घारे यांच्या आव्हान नगर पंचायत निवडणुकीनंतर आता देखील कायम आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, शिवसेना (उबाठा), शेतकरी कामगार पक्ष आणि मित्रपक्षांची परिवर्तन विकास आघाडीने कर्जत खालापूर तालुक्यात एकत्र येत शिवसेना शिंदे गटाला रोखण्याची मोर्चेबांधणी केलेली आहे. त्यामुळे आमदार थोरवे यांच्या समोर सुधाकर घारे यांनी आव्हान कायम ठेवल्याचे बोलले जात आहे. कर्जत नगर परिषद निवडणुकीत सुधाकर घारे आणि



शिवसेनेचे उपजिल्हाध्यक्ष नितीन सावंत यांनी आमदार थोवरे यांना धोबीपछाड दिली होती. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचाला पोहचला आहे.

दरम्यान, सुधाकर घारे यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारात आघाडी घेतली आहे. त्यामुळे परिवर्तन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये जोश आला आहे. नितीन सावंत आणि घारे यांच्या एकत्रित येण्यामुळे कर्जत खालापूरात आघाडीचे बळ वाढले आहे. त्यामुळे थोरवे यांच्यासमोर आता पुन्हा आव्हान उभे राहिले आहे.

बीड पंचायत समिती गणातून सुधाकर घारे यांच्या पत्नी नमिता घारे यांना उमेदवारी दिली आहे. बीड पंचायत समिती गण घारे यांचा गड समजला जातो. त्यामुळे पंचायत समिती निवडणुकीत देखील आता चुरस वाढली आहे. घारे यांनी कर्जत तालुक्यात आमदार थोरवे यांना रोखण्यासाठी आता जोरदार मोर्चेबांधणी सुरु केली आहे. सुधाकर घारे रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्षपद भुषविले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात त्यांचा जनसंपर्क मोठा आहे.

ग्रामीण भागात त्याना मानणारा मोठा वर्ग आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची ताकद वाडी वस्त्यांवर पोहचविण्यात त्यांनी मागच्या काळात मेहनत घेतली आहे. जिल्हा परिषदेच्या कामाचा अनुभव आणि पक्ष संघटनेची ताकद या शिवाय आता परिवर्तन विकास आघाडीचे बळ यामुळे आमदार थोवरे यांच्यासमोर घारे यांचे मोठे आव्हान असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

---



**सामाजिक क्षेत्रात माजी नगरसेवक शिवाजी थोरवे यांना सामाजिक उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल समाज रत्न म्हणून नामांवत दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यात आला**

**( दैनिक युवक आधार )**

---

## खोपटा येथे शतकोत्तर "अखंड हरिनाम व गुरु दशमी सोहळा"; संतश्रेष्ठ गोपाळकाका महाराजांच्या परंपरेचा भव्य उत्सव

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/ उरण रायगड :** श्री परमपूज्य सद्गुरु गोपाळकाका महाराज ट्रस्ट, खोपटे बांधपाडा (उरण) यांच्या वतीने शतकोत्तर परंपरेने साजरा होणारा "अखंड हरिनाम व गुरु दशमी सोहळा तसेच ज्ञानेश्वरी पारायण" महोत्सव यंदाही मोठ्या भक्तिभावात आयोजित करण्यात आला आहे. श्रीमतपरमहंस जीवनमुक्त स्वामी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत सुरू झालेली ही आध्यात्मिक परंपरा आता १०० वर्षांहून अधिक काळ अखंड सुरू आहे.संतशिरोमणी गोपाळकाका महाराजांनी गृहस्थाश्रमात राहून कीर्तन, अभंग, प्रवचनातून भक्ती, नैतिकता, व्यसनमुक्ती व समाजप्रबोधनाचा संदेश दिला. त्यांच्या जीवनातील आध्यात्मिक अनुभव व जनकल्याणासाठी केलेल्या कार्यामुळे ते जनमानसात संतस्वरूप मानले जातात. त्यांच्या कृपेनेच ही परंपरा पुढे वाढत असून आजही अनेक भक्तांना आध्यात्मिक आधार व मार्गदर्शन मिळत असल्याच्या अनुभूती व्यक्त केल्या जातात




महोत्सवाचा प्रारंभ माघ शुद्ध षष्ठी, शनिवार दि. २४ जानेवारी २०२६ रोजी झाला असून समारोप माघ शुद्ध द्वादशी, शुक्रवार दि. ३० जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. या कालावधीत काकडा व आरती, ज्ञानेश्वरी वाचन, हरिपाठ, भजन, कीर्तन, जागर भजन व महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम दररोज होत आहेत. राज्यभरातील ख्यातनाम कीर्तनकार — ह.भ.प. संजय महाराज पाटील, ज्ञानेश्वर महाराज शिंदे, रामकृष्ण महाराज मोकळ, ज्ञानेश्वरी महाराज ठाकूर, वामन महाराज भोर, तुषार महाराज पाटील, नंदकुमार महाराज गावंड आदी मान्यवरांची कीर्तनसेवा लाभत आहे. विशेष म्हणजे, श्री जीवनमुक्त स्वामी महाराज पादुका पूजन, ग्रंथ दिंडी, महाआरती, तसेच विविध भजन मंडळांच्या सहभागामुळे संपूर्ण खोपटा परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला आहे. ग्रामस्थ, वारकरी, महिला मंडळे, युवक मंडळे आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. श्री हेमवर्ण घनश्याम ठाकूर यांनी सर्व भाविकांना या पवित्र सोहळ्यात सहभागी होऊन नामस्मरण, कीर्तन व ज्ञानेश्वरी श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

"आम्ही काकांचे वारकरी, नित्य मुखी रामकृष्ण हरी" या जयघोषात खोपटा नगरीत भक्तिरसाचा महापूर उसळला असून देहू–आळंदीप्रमाणेच हे स्थान वारकऱ्यांसाठी श्रद्धास्थान बनत आहे.

---

## जासई हायस्कूलमध्ये मतदान जनजागृती व कॉफी मुक्त अभिमान जनजागृती सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे,श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि बा पाटील ज्युनिअर कॉलेज जासई ,या विद्यालयांमध्ये आज मतदान जनजागृती मोहीम व इयत्ता दहावी बारावी कॉपीमुक्त परीक्षा घेण्याची मोहीम राबविण्यात आली .मतदान जनजागृती मोहीम उरण तालुक्याच्या गटशिक्षण अधिकारी सौ घरत एन एम मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

मतदान जनजागृती या विषयावर रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जासई , येथील शिक्षक रुपेश पाटील सर व सहाय्यक शिक्षक कडू सर यांनी सर्व पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी संविधानानुसार मतदान हा आपला फक्त व कर्तव्य आहे. आणि ते कर्तव्य पार पाडणे ही आपली मोलाची जबाबदारी आहे. आपले मतदान करून आपण आपले कर्तव्य पार पाडावे व योग्य मतदारास निवडून द्यावे यावर मार्गदर्शन केले.

त्यानंतर छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि बा पाटील ज्युनियर कॉलेज जासई येथील मुख्याध्यापिकास सौ के जी म्हात्रे मॅडम यांनी आलेल्या मतदारांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून दिली. तसेच शाळेच्या पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम उपस्थित होत्या. सभेचे अध्यक्ष सौ म्हात्रे के जी मॅडम यांनी मतदारांना येत्या होणाऱ्या पाच जानेवारी रोजी मतदानामध्ये आपण आपले कर्तव्य योग्य रीतीने पार पाडावे याबद्दल त्यांनी सर्व



पालकांना मार्गदर्शन केले. यानंतर रुपेश पाटील सर व कडू सर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता नववी अ च्या विद्यार्थ्यांनी गावामध्ये मिरवणूक काढून मतदान राजा जागा हो लोकशाहीचा विजय हो अशा घोषणा करून जनजागृती करण्याचा उपक्रम राबविला

त्यानंतर जमलेल्या पालकांना येता येणाऱ्या शैक्षणिक वर्षाचे दहावी व बारावीची परीक्षा शासन धोरणानुसार संपूर्ण परीक्षा ही कॉपीमुक्त कशाप्रकारे होईल याविषयी मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्याने जर आपला अभ्यास प्रामाणिकपणे करून पेपर लिहिला व असे दुर्गटित प्रकार केले नाही तर वरील योजना यशस्वी करण्यात खूप मदत होईल.

यासाठी पालकांनी विद्यार्थ्याचा नियोजनबद्ध नियमित अभ्यास घेणे आवश्यक आहे व आपला विद्यार्थी काय करत आहे यावर लक्ष ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे याविषयी मार्गदर्शन केले शेवटी विद्यालयाच्या सहाय्यक शिक्षिका सौ एम के मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपन्न झाली.

# दादासाहेब फाळके पुरस्काराने साईनाथ पवार यांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले/मुंबई :** रविंद्र नाट्य मंदिर, मुंबई येथे दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या वतीने आयोजित वार्षिक पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या समारंभात शैक्षणिक व दिव्यांग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत साईनाथ पवार यांना दादासाहेब फाळके पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला. सुप्रसिद्ध अभिनेते अरुण नलावडे यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.




हा भव्य सोहळा युनियनचे अध्यक्ष अजित महामुनकर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला होता. दरवर्षीप्रमाणे यंदाही चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकार, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम अत्यंत देखण्या स्वरूपात पार पडला.

साईनाथ पवार हे दिव्यांग प्रशासनात कार्यरत असून ते अपंग संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. प्रशासन तसेच संघटनेच्या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत दिव्यांगांच्या हक्कांसाठी, शिक्षण, रोजगार व सामाजिक सक्षमीकरणासाठी भरीव कार्य केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना यापूर्वीही विविध सन्मान व पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

दादासाहेब फाळके पुरस्कार स्वीकारताना साईनाथ पवार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, “हा पुरस्कार माझ्या कार्याला नवी ऊर्जा देणारा आहे. दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा या सन्मानातून मिळाली आहे.”

# संत रोहिदास नगर वस्तीमध्ये उत्साहात प्रजासत्ताक दिन साजरा

**किशोर गुडेकर, मुंबई/विभाग प्रतिनिधी प्रमुख :** विलेपार्ले विभागातील सहार भागात येणाऱ्या जोगेश्वरी (पूर्व) येथील संत रोहिदास नगर वस्तीमध्ये सेवा भारती कोकण प्रांत ट्रस्ट संचालित माता-बाल आरोग्य आहार प्रकल्पाच्या माध्यमातून प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामुळे वस्तीतील नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, संस्कार आणि सामाजिक सलोखा यांचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.



कार्यक्रमाची सुरुवात भारत माता पूजनाने करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत सादर करून उपस्थित सर्वांनी देशाप्रती आपली निष्ठा व्यक्त केली. पुढे सांघिक गीत, भारत माता आरती व कल्याण मंत्र अशा विविध उपक्रमांद्वारे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला. विशेषतः लहान मुलांनी तिरंग्याच्या रंगातील पोशाख परिधान करून सहभाग घेतल्यामुळे कार्यक्रमाला अधिकच रंगत आली. बालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे उपस्थितांमध्ये आनंदाचे व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन कार्यकर्ती साक्षिका संजय प्रियोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमात सेवित ताई, दीपिका ठाकूर, अंकिता राठोड, दीपिक गोहिल, मिता सुमेसरा, जान्हवी पेठावे, हेमा भाटी, विमला चौहान आदी सेवाभावी कार्यकर्त्यांची मोलाची उपस्थिती लाभली. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम सुयोग्यरीत्या पार पडला.

यावेळी संत रोहिदास नगर वस्तीतील महिला, पुरुष, लहान मुले तसेच साई सिद्दी मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवा भारतीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या माता-बाल आरोग्य आहार प्रकल्पामुळे वस्तीतील माता व बालकांच्या आरोग्यविषयक जाणीवा वाढविण्यास हातभार लागत असून, अशा सामाजिक व राष्ट्रीय कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक विचारांची रुजवण होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने करण्यात आली. एकूणच, प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा संदेश वस्तीतील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# प्रजासत्ताक दिनाच्या औचित्यावर श्री संत साईबाबा शाळेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

## लवकरच माजी विद्यार्थी संघाची होणार औपचारिक स्थापना

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (प्रतिनिधी) :** प्रजासत्ताक दिनाच्या पवित्र औचित्यावर श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. “शाळेने घडवले, आता शाळेसाठी काहीतरी देण्याची वेळ” या भावनेतून माजी विद्यार्थी एकत्र आले असून, येत्या काळात माजी विद्यार्थी संघाची औपचारिक स्थापना करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

ही संकल्पना शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पाटील यांनी मांडली होती. माजी विद्यार्थी हे शाळेची चालती-बोलती ओळख असतात या विचारातून त्यांनी माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, सध्या तयार करण्यात आलेल्या संपर्क लिंकला




१३२ माजी विद्यार्थी जोडले गेले आहेत.

या निमित्ताने आयोजित प्रत्यक्ष स्नेह मेळाव्यास सुमारे ३० माजी विद्यार्थी उपस्थित होते.बांठिया शाळेचे प्राचार्य भगवान माळी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमास जे. के. कुंभार हे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी माजी विद्यार्थ्यांना संबोधित करताना शाळा आणि विद्यार्थी यांचं नातं आयुष्यभर टिकणारं असतं, असे सांगत संघटनबद्ध राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय आठवणी, शिक्षकांचे ऋण आणि आजच्या यशामागे शाळेचा वाटा याविषयी भावनिक मनोगत व्यक्त केले. शिक्षकांनीही आपल्या माजी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक करत त्यांच्या प्रगतीचा अभिमान व्यक्त केला.

या स्नेह मेळाव्यात शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासासाठी सहकार्य, मार्गदर्शन तसेच विविध उपक्रमांच्या माध्यमातून हातभार लावण्याचा संकल्प माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.लवकरच माजी विद्यार्थी संघाची औपचारिक स्थापना करून अधिक नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला.

शाळा आणि माजी विद्यार्थी यांच्यात आज बांधलेला हा संवादाचा सेतू भविष्यात शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निश्चितच फलदायी ठरेल, असा विश्वास मुख्याध्यापिका वैशाली पाटील यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून सहाय्यक शिक्षक नवनीत गावंड यांनी काम पाहिले. त्यांनी उपस्थित माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य व सकारात्मक प्रतिसादाबद्दल आभार मानले.

# डॉ. नंदकुमार जाधव यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले/मुंबई :** रविंद्र नाटक मंदिर, मुंबई येथे आयोजित दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या वार्षिक पुरस्कार समारंभात शैक्षणिक व अपंग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अभिनेता अरुण नलावडे यांच्या हस्ते डॉ. नंदकुमार मारुती जाधव यांना 2025 दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा सोहळा अध्यक्ष अजित महामुनकर यांच्या संकल्पनेतून आणि युनियनच्या वतीने दरवर्षी प्रमाणेच दिग्गज कलाकारांच्या उपस्थित भव्यपणे पार पडला.

समारंभात कलाविश्वातील विविध क्षेत्रांची उपस्थिती होती; कलाकार, समाजसेवक आणि शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील मान्यवरांनी हात जोडून डॉ. जाधव यांच्या कामाचे कौतुक केले.

आयोजकांनी नमूद केले की डॉ. जाधव यांनी अपंग वर्गाच्या पुनर्वसन, शिक्षण आणि समाजसमावेशासाठी केलेल्या दीर्घकालीन प्रयत्नांमुळे त्यांना हा सन्मान दिला गेला आहे.

**डॉ. जाधव यांच्या कार्याचे थोडक्यात वैशिष्ट्य:**

अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शैक्षणिक व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम




राबविणे.

समाजातील दुर्बल घटकांसाठी पुनर्वसन व समावेशक उपक्रम राबविणे.

स्थानिक आणि राज्यस्तरीय स्तरावर जनजागृती च्या माध्यमातून बदल घडवून आणणे.

पुरस्कार स्वीकारताना डॉ. जाधव यांनी आपल्या सहकाऱ्यांचे, स्वयंसेवकांचे आणि कुटुंबाचे आभार मानले आणि भविष्यात अपंग समुदायाच्या सेवेसाठी अधिक ठोस उपक्रम राबविण्याचे आश्वासन दिले.

समारंभात अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आणि या क्षेत्रात पुढील पिढ्यांसाठी प्रेरणा म्हणून त्यांचे काम उल्लेखनीय असल्याचे म्हटले.

# अजित दादांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्रावर शोककळा; श्रीवर्धनमध्ये कडकडीत बंद

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाच्या दुःखद बातमीने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. लोकनेता आणि कामाचा माणूस अशी वेगळी ओळख निर्माण केलेल्या अजितदादांच्या जाण्याने सर्वसामान्य नागरिकांपासून राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांपर्यंत सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन शहरातील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आज श्रीवर्धन बंद पाळला. सकाळपासूनच बाजारपेठा, दुकाने, आस्थापने बंद ठेवण्यात आली होती. शहरातील रस्त्यांवर शांतता होती, तर नागरिकांच्या चेहऱ्यावर शोकभाव स्पष्टपणे दिसून येत होता.

अजितदादा पवार हे विकासाभिमुख, निर्णयक्षम आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सतत धाव घेणारे नेते म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राने एक कर्तृत्ववान आणि प्रभावी नेतृत्व गमावल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

दरम्यान, श्रीवर्धनमध्ये विविध सामाजिक, व्यापारी संघटनांतर्फे बंद पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. “अजितदादा कायम जनतेच्या मनात राहतील,” अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# जिल्हा क्रीडा पुरस्काराने सेजल मकवाना सन्मानित

## ज्युनियर वर्ल्ड व आशियाई पदक विजेतीचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** पॉवरलिफ्टिंग क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर देश व राज्याचा नावलौकिक वाढवणाऱ्या मुंबई उपनगर जिल्ह्यातील खेळाडू सेजल दीपक मकवाना हिला सन २०२४–२५ चा जिल्हा क्रीडा पुरस्कार – “गुणवंत महिला खेळाडू” या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सेजल मकवाना ही दोन वेळा ज्युनियर वर्ल्ड मेडलिस्ट, तसेच दोन वेळा आशियाई स्पर्धेतील पदक विजेती असून तिने राष्ट्रीय पातळीवर नॅशनल रेकॉर्ड आपल्या नावावर नोंदवला आहे. सातत्यपूर्ण मेहनत,




कठोर सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तिने पॉवरलिफ्टिंगमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत मुंबई उपनगर जिल्ह्याचा मान देश-विदेशात उंचावला आहे.

गेल्या सात वर्षांपासून TRUE POWER GYM येथे कोच संकेत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सेजल नियमित व शिस्तबद्ध सराव करत आहे. कोच संकेत चव्हाण यांच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे, शारीरिक क्षमतेसोबत मानसिक मजबुती मिळाल्याने सेजलने आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यशाची शिखरे गाठली. तिच्या या यशामागे प्रशिक्षक, कुटुंबीय व जिम व्यवस्थापनाचा मोठा वाटा असल्याचे सेजलने सांगितले.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास जिल्ह्यातील मान्यवर अधिकारी, क्रीडा क्षेत्रातील पदाधिकारी, प्रशिक्षक, खेळाडू आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारताना सेजल मकवानाने “हा सन्मान माझ्या मेहनतीची पावती असून यापुढेही देशासाठी अधिकाधिक पदके जिंकण्याचा निर्धार” व्यक्त केला.

सेजल मकवानाच्या या यशामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यातील तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळाली असून, महिला खेळाडूंसाठी ती एक आदर्श ठरत आहे.

# १ फेब्रुवारी रोजी योग व आरोग्य संदर्भ ग्रंथालयाचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** योग व आरोग्य क्षेत्रातील अभ्यासक, साधक व सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या योग व आरोग्य संदर्भ ग्रंथालयाचे भव्य उद्घाटन रविवार, दिनांक १ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने ग्रंथालयात उपलब्ध




असलेल्या योग व आरोग्य विषयावरील विविध ग्रंथांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या ग्रंथालयात योगशास्त्र, नैसर्गिक उपचार, आहार-विहार, मानसिक आरोग्य, जीवनशैली सुधारणा आदी विषयांवरील महत्त्वपूर्ण व संदर्भात्मक पुस्तके उपलब्ध असून, हे ग्रंथालय आरोग्याबाबत जनजागृतीसाठी उपयुक्त ठरणार आहे.

उद्घाटनप्रसंगी आयोजित ग्रंथप्रदर्शनामुळे वाचकांना विविध लेखकांची व संशोधकांची पुस्तके एकाच ठिकाणी पाहण्याची तसेच अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे.

या कार्यक्रमास योगप्रेमी, आरोग्य विषयक अभ्यासक तसेच नागरिकांनी आपल्या सहकाऱ्यांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी 5 ऐवजी 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान; 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी

**दैनिक युवक आधार**
**पंडित फंगाळ/मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे 12 जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून 5 फेब्रुवारी 2026 ऐवजी आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान; तर 7 फेब्रुवारी 2026 ऐवजी 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी 13 जानेवारी 2026 रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी 31 जानेवारी 2026 च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारी 2026 रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात 28 जानेवारी 2026 ते 30 जानेवारी 2026 पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना 31 जानेवारी 2026 रोजी प्रसिद्ध करतील. आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती 5 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 10 वाजता होईल. संबंधित ठिकाणी 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात 11 फेब्रुवारी 2026 पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

# सिल्लोड तालुक्यात २५० शाळांमध्ये 'आरोग्य जागर'

## जिल्हाधिकाऱ्यांच्या 'दशसूत्री'चा धडाका; आरोग्य-शिक्षण विभागाचा संयुक्त उपक्रम यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :** विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रगतीसोबतच शारीरिक आणि मानसिक पाया भक्कम करण्याच्या उद्देशाने, छत्रपती संभाजीनगरचे माननीय जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'दशसूत्री' कार्यक्रमाचा सिल्लोड तालुक्यात ऐतिहासिक धडाका पाहायला मिळाला. तालुका आरोग्य विभाग आणि शिक्षण विभागाच्या अभूतपूर्व समन्वयातून तालुक्यातील जवळपास २५० शाळांमध्ये एकाच वेळी 'निरोगी विद्यार्थी / आरोग्यक्षम विद्यार्थी' अभियानांतर्गत भव्य आरोग्य समुपदेशन कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली. प्रशासकीय यंत्रणेने थेट 'शाळेच्या दारी' जात हजारो विद्यार्थ्यांशी संवाद साधल्याने तालुक्यात या मोहिमेचे मोठे कौतुक होत आहे.



या भव्य मोहिमेच्या यशस्वीतेमागे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नासेर खान पठाण यांचे सूक्ष्म नियोजन आणि त्यांचा 'सूक्ष्म कृती आराखडा' मैलाचा दगड ठरला. डॉ. पठाण यांनी प्रत्येक शाळेसाठी स्वतंत्र आरोग्य पथके नियुक्त केली होती, ज्यामध्ये शासकीय वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, परिचारिका, ए.एन.एम., बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW - पुरुष) आणि आशा स्वयंसेविकांचा समावेश होता. या संपूर्ण यंत्रणेने एकाच वेळी २५० शाळांमध्ये उपस्थित राहून आरोग्य प्रबोधनाचा यज्ञ राबवला. याकामी गट शिक्षणाधिकारी रमेश ठाकूर आणि त्यांच्या शिक्षण विभागाने आरोग्य यंत्रणेशी चोख समन्वय साधल्यामुळेच इतक्या प्रचंड व्याप्तीचा कार्यक्रम वेळेत पूर्ण होऊ शकला.

कार्यशाळेत तज्ज्ञांनी प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या जिव्हाळ्याच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. यामध्ये साबणाने हात धुणे, वैयक्तिक स्वच्छता पाळणे, जंक फूडला फाटा देऊन ॲनिमिया मुक्ततेसाठी लोहयुक्त घरगुती आहार घेणे आणि मोबाईलचे व्यसन सोडून दररोज किमान एक तास मैदानावर खेळण्याचे आवाहन करण्यात आले. विशेषतः किशोरवयीन मुलींशी संवाद साधताना वयानुसार होणारे शारीरिक बदल आणि मासिक पाळी स्वच्छता याबाबत डॉक्टरांनी मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन केले. तसेच तंबाखू, गुटखा यांसारख्या सामाजिक व्यसनांपासून दूर राहण्यासह अल्पवयीन मुलांनी वाहन चालवू नये अशा कडक सूचना व शपथही यावेळी देण्यात आली. 'निरोगी विद्यार्थी तरच समर्थ भारत' हा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी स्वागत केले असून, या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याप्रती नवी जाणीव निर्माण झाली आहे.

# जनतेशी थेट संवाद साधून विकासाभिमुख धोरणांना दिशा देणारा कुटुंबप्रमुख हरपला

## कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशीम राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, कुशल प्रशासक आणि जनतेचा खरा लोकनेता असलेले अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. "आज महाराष्ट्राने केवळ एक अनुभवी नेता नाही, तर जनतेशी थेट संवाद साधणारा, विकासालाच आपला धर्म मानणारा कर्तव्यदक्ष लोकनेता गमावला आहे," अशा शब्दांत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

"ही वेदना केवळ राजकीय नाही, तर कुटुंबातील माणूस हरपल्यासारखी आहे. शब्द अपुरे पडत आहेत… अजितदादा आमच्यासाठी फक्त नेते नव्हते, ते आधार होते, मार्गदर्शक होते, कठीण वेळी पाठीशी उभं राहणारं कुटुंबातलं माणूस होते," असे सांगताना मंत्री भरणे भावुक झाले.

अजितदादांच्या सहवासातूनच आपल्या सामाजिक व राजकीय जीवनाची सुरुवात झाली, असे नमूद करताना भरणे म्हणाले, "माझ्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर दादांचा आधार, मार्गदर्शन आणि आशीर्वाद लाभला. माझ्यासारख्या हजारो कार्यकर्त्यांना त्यांनी उभं केलं, घडवलं, विश्वास दिला. कार्यकर्त्यापासून मंत्री होण्यापर्यंतचा माझा प्रवास दादांच्या पाठबळामुळेच शक्य झाला."



चार दशकांच्या राजकीय प्रवासात अजित पवार यांनी लाखो कार्यकर्त्यांना बळ दिले. जातीपातीच्या राजकारणापेक्षा विकास आणि सामान्य माणूस हेच त्यांचे व्हिजन होते. पहाटे पाच वाजल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत महाराष्ट्रासाठी काम करणारा हा नेता अखेरच्या श्वासापर्यंत सामान्य नागरिकांसाठी झटत राहिला.

पिंपरी-चिंचवड आणि बारामतीसारखी रोल मॉडेल शहरे उभारताना त्यांनी विकासाची नवी दिशा दिली. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक सहा वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवण्याचा विक्रम, तब्बल अकरा वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान आणि सिंचन, ऊर्जा, वित्त अशा महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सांभाळताना त्यांनी दाखवलेली दूरदृष्टी महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर राहील.

"आजही विश्वास बसत नाही की अजितदादा आपल्यात नाहीत. बारामती येथे त्यांची सभा नियोजित होती. मुंबईहून येताना विमानाच्या लँडिंगदरम्यान झालेल्या दुर्दैवी अपघातात त्यांचे निधन झाले, ही घटना मनाला हादरवून टाकणारी आहे," असे भरणे यांनी सांगितले.

"आपल्यासोबत असणारा, प्रेरणा देणारा, कामातून नेतृत्व शिकवणारा सहकारी गमावणं म्हणजे आयुष्यात निर्माण झालेली प्रचंड पोकळी आहे," असे नमूद करत त्यांनी पवार कुटुंबीयांना दुःख सहन करण्याची ताकद देवो, अशी प्रार्थना केली.

"दादा आज आपल्यात नसले तरी प्रत्येक विकासकामात त्यांची आठवण कायम जिवंत राहील," अशा शब्दांत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या महान लोकनेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# श्रीराम क्लासेस च्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** सातत्यपूर्ण प्रामाणिक परिश्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीच्या बळावर निफाड एज्युकेशन अँन्ड सोशल फाउंडेशन संचलित श्रीराम क्लासेस यांनी आपल्या यशस्वी वाटचालीची 17 वर्षे पूर्ण करून 18 व्या वर्षात पदार्पण केले असून. या निमित्ताने २५ जानेवारी २०२६ रोजी शिवनेरी लॉन्स, निफाड येथे सांस्कृतिक कार्यक्रम व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.. निफाड शहरात…. अवघ्या २ ते ५ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला हा ज्ञानवृक्ष आज शेकडो विद्यार्थ्यांना घडविणारा वटवृक्ष बनला आहे. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण देणारा निफाडमधील एकमेव क्लास म्हणून श्रीराम क्लासेसने ओळख निर्माण केली आहे.

केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे एवढ्यापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांना सुसंस्कृत,



स्वयंप्रेरित, स्वयंशासित, स्वावलंबी व मूल्याधिष्ठित नागरिक घडविण्याचा संकल्प श्रीराम क्लासेसने यशस्वीरीत्या जपला आहे. विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे क्लासेसच्या गुणवत्तेचे द्योतक आहे.

कार्यक्रमाची सुरवात दीपज्योत प्रज्वलन करून , सरस्वती माता, श्रीराम व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणेश वंदना, उदे गं आंबे उदे, खंडोबाची हळद लागली, संत-विठ्ठल अभंग, शिवाजी महाराज, देशभक्तिपर गीत तसेच यावेळी सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून वारकरी संप्रदायाचे विचार, संतपरंपरा व भक्ती भाव लहान मुलांनी अत्यंत सुंदररीत्या सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. या सादरीकरणातून शिक्षणासोबत संस्कारांची जोपासना होत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

निफाड एज्युकेशन अँन्ड फाउंडेशनच्या वतीने गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळीमेघा जंगम मॅडम (संस्कारधन ग्रंथाच्या लेखिका),दिगंबर पाटील (अध्यक्ष – निफाड एज्युकेशन अँन्ड फाउंडेशन),ह.भ.प. राजेंद्रजी महाराज थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, व्याख्याते राहुल गिरी (बीड) यांनी पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर योग्य, अचूक आणि अभ्यासपूरक पद्धतीने करावा" असे आवाहन केले.

श्रीराम क्लासेसच्या यशाबाबत बोलताना संचालक उल्हास पाटील व. सविता पाटील यांनी सांगितले की,"विद्यार्थ्यांचे यश हेच आमचे ध्येय आहे. पालक, विद्यार्थी व संपूर्ण शिक्षकवृंद यांच्या सहकार्यामुळेच गेल्या 17 वर्षांची ही यशस्वी वाटचाल शक्य झाली."…..

१४ एप्रिल २००८ पासून दरवर्षी सातत्याने बक्षीस वितरण व सत्कार सोहळा आयोजित करण्याची परंपरा श्रीराम क्लासेसने जपली असून, भविष्यातही शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचा निर्धार प्रा. उल्हास पाटील यांनी नी व्यक्त केला.

# सदगुरू फाउंडेशनला आरोग्य विभागात राष्ट्रीय पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे :** अटल सन्मान समारोह २०२६ मध्ये सदगुरू फाउंडेशनला वर्षातील सर्वोत्तम आरोग्यसेवा उपक्रम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आरोग्यसेवा आणि सामाजिक कल्याण क्षेत्रात, विशेषतः वंचित आणि उपेक्षित समुदायांसाठी फाउंडेशनच्या उत्कृष्ट योगदानाची दखल हा पुरस्कार दिला जातो.

प्रसिद्ध भारतीय अभिनेत्री हुमा कुरेशी, भारत सरकारचे केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान जी, भारत सरकारचे केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान आणि भारत सरकारचे केंद्रीय ऊर्जा आणि नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदगुरू




फाउंडेशनच्या वतीने दीपेंद्रसिंग सोलंकी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

हे फाऊंडेशन कर्करोगाच्या रुग्णांना आर्थिक मदत तसेच नियमितपणे दुर्गम गावांमध्ये, विशेषतः आदिवासी भागात जिथे मूलभूत आरोग्य सुविधा उपलब्ध नाहीत आणि जिथे पूर्वी कोणतीही वैद्यकीय मदत पोहोचलेली नाही अशा ठिकाणी मोफत वैद्यकीय शिबिरे आयोजित केली जातात.

# महिला सक्षमीकरण हेच भाजपचे ध्येय – आ. प्रशांत ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** सर्वसामान्य नागरिकांचा सर्वांगीण विकास साधत त्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी भारतीय जनता पार्टी सातत्याने कार्यरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली महिलांच्या सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य देण्यात येत असून महिलांच्या हिताची काळजी घेणे ही भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

विचुंबे येथे दुर्गा माता महिला मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ विचुंबे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



करण्यात आलेल्या 'लाडकी बहीण' मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून महिलांचा आवाज बुलंद करण्यासाठी भाजप महायुतीच्या पालीदेवद जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार प्राची अमित जाधव आणि विचुंबे पंचायत समिती गणाच्या उमेदवार नीलम प्रमोद भिंगारकर या दोन भगिनी सज्ज असल्याचे आवर्जून नमूद केले.या मेळाव्यात महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना महिलांचा उत्स्फूर्त आणि मोठ्या संख्येने प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, सरपंच प्रमोद भिंगारकर, बळीराम पाटील, अविनाश गायकवाड, अनिल भोईर, अनंत गायकवाड, विवेक भोईर, चेतन सुरते, श्रावणी भोईर, आरती गायकवाड, विभूती सुरते, प्रगती गोंधळी, स्वाती पाटील, भाग्यश्री भोईर, हर्षदा भिंगारकर, निकिता म्हात्रे, अमित म्हात्रे, कविता भोईर, प्राजक्ता भोईर, प्रमिला म्हात्रे, ज्योती भोईर, सोनम म्हात्रे, प्रणाली पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय टेनिस हॉलीबॉल स्पर्धेत श्री बाल मुकुंद राठी विद्यालयाच्या वयगटातील१४ मुलींचा संघ ठरला मुलींचा संघ रोप्य पदाचे मानकरी

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे/तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** अचलपूर तालुक्यातील शिरजगाव कसबा विद्यालयाचे विद्यार्थी/ उदगीर. जिल्हा लातूर येथे झालेल्या राज्यस्तरीय टेनिस हॉलीबॉल स्पर्धेत श्री बाल मुकुंद राठी विद्यालयास रोप्य पदक उदगीर जिल्हा लातूर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय टेनिस हॉलीबॉल शिरजगाव कसबा येथील श्री बालमुकुंद राठी विद्यालयाच्या १४ वर्षाखाली



मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रोप्य पदक पटकावले. स्पर्धेदरम्यान संघाने शिस्तबद्ध खेळ, संघभावना व कौशल्याच्या जोरावर अंतिम फेरीत प्रवेश केला. या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला राज्यस्तरावर मान्यता मिळाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री विजयरावजी राठी. उपाध्यक्ष श्री श्यामसुंदर राठी. व सचिव श्री प्रशांतजी राठी यांनी खेळाडू व मार्गदर्शकाचे अभिनंदन केले. तसेच विद्यालयांचे मुख्याध्यापक श्री सुरडकर सर, पर्यवेक्षक श्री नवलकर सर, प्रशिक्षक श्री दंडाळे सर तसेच श्री सर्वेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हे यश संपादन केले. या यशाबद्दल शिक्षकवृंद पालव व क्रीडाप्रेमींनी समाधान व्यक्त करून खेळाडूंच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# निवृत्तीवेतन योजनांच्या लाभार्थ्यांसाठी हयात प्रमाणपत्र आता ऑनलाईन!; 'बेनेफिशियरी सत्यापन ॲप' वापरण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम, दि.२९ जानेवारी केंद्र व राज्य शासनाच्या विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत विविध सामाजिक अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, विधवा व दिव्यांग निवृत्तीवेतन योजना यांचा समावेश आहे.

या योजनांच्या लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र (लाईफ सर्टिफिकेट) अधिक सुलभ, पारदर्शक व कार्यालयीन फेऱ्यांपासून मुक्त करण्यासाठी केंद्र शासनाने 'बेनेफिशियरी सत्यापन ॲप' विकसित केले आहे.

या ॲपच्या माध्यमातून लाभार्थी आपले डिजिटल लाईफ सर्टिफिकेट (DLC) मोबाईलवरूनच ऑनलाईन काढू शकणार आहेत. हे प्रमाणपत्र थेट NSAP पोर्टलवर अद्ययावत होणार असल्यामुळे कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही.त्यामुळे केंद्र पुरस्कृत निवृत्तीवेतन योजनांच्या सर्व लाभार्थ्यांनी Google Play Store वर उपलब्ध 'Beneficiary Verification App' डाऊनलोड करून आपले हयात प्रमाणपत्र ऑनलाईन काढावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

मोबाईलवरूनच हयात प्रमाणपत्र!
Google Play Store वरून
Beneficiary Verification App डाऊनलोड करा
घरबसल्या डिजिटल लाईफ सर्टिफिकेट मिळवा
कार्यालयीन फेऱ्यांचा त्रास टाळा

# दोन तासात आत्महत्येचा इशारा देणाऱ्या व्हायरल व्हिडिओची दखल; तहसिलदार व पोलिसांच्या तत्परतेमुळे धानोरेतील पंधरा वर्षांचा शेतरस्त्याचा वाद अखेर मिटला

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी/राजेश भडांगे/धानोरे :** दोन तासात आत्महत्येचा इशारा देणाऱ्या व्हायरल व्हिडिओची दखल घेत, धानोरे (ता. निफाड) येथील गट क्रमांक १२४ मधील शेतजमिनीचा पंधरा वर्षांपासून सुरू असलेला वाद अखेर तहसिलदार व पोलिसांची तत्परता व समन्वयात्मक हस्तक्षेपामुळे शांततेत निकाली निघाला.

येथील दत्तात्रय संपत तासकर या युवकाने व्हिडिओद्वारे आपली कैफियत मांडत प्रश्न तात्काळ निकाली न निघाल्यास दोन तासात विहिरीत आत्महत्या करण्याचा इशारा दिला होता. सदर व्हिडिओमध्ये माझ्या शेतजमिनीच्या बांध व वहिवाटी रस्त्यावरून गेल्या पंधरा वर्षांपासून वाद सुरू आहे. आम्ही चाळीस वर्षांपासून वापरत असलेला वहिवाटी

रस्ता प्रतिवादी चुलत भाऊ व त्याचे कुटुंबियांनी गेल्या दोन महिन्यांपासून बंद केला आहे. त्यामुळे माझी शेती पडीक पडली आहे. मी यापूर्वी वारंवार पोलीस



ठाण्यात तक्रारी दिल्या असूनही प्रत्यक्ष कारवाई झाली नाही. तसेच महसूल कार्यालयात अर्ज करूनही मला संबंधित अधिकाऱ्यांची भेट मिळाली नाही. न्यायालयात प्रकरण प्रलंबित असतानाही

> आत्महत्येचा इशारा देणारा व्हायरल व्हिडिओ अत्यंत गंभीर होता. मानवी दृष्टिकोनातून परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ घटनास्थळी जाऊन दोन्ही बाजूंची वस्तुस्थिती जाणून घेतली. हे प्रकरण महसुली स्वरूपाचे असल्याने तहसीलदारांशी समन्वय साधून शांततेने तोडगा काढण्यात आला. कायदा व सुव्यवस्थेला बाधा येऊ नये यासाठी पोलिस प्रशासन सतर्क असून कोणताही दबाव, धमकी किंवा हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही.
>
> भास्करराव शिंदे
> ठाणे प्रभारी, लासलगाव

प्रतिवादी हस्तक्षेप, अडवणूक व धमक्या देत आहेत. तीन वर्षांपूर्वी प्रतिवादींनी मला मारहाण केली तसेच माझ्या अडीच महिन्यांच्या गरोदर पत्नीला लाथा - बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याने गर्भपात झाला. सामायिक विहिरीचे पाणी प्रतिवादी एकतर्फी वापरत असून तीन वर्षांपासून माझ्या शेतीला पाणी नाही. त्यामुळे आजवर अंदाजे २५ ते ३० लाखांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे वहिवाटी रस्ता तात्काळ खुला करून संरक्षण द्यावे, सामायिक विहिरीच्या वापराबाबत न्याय द्यावा, प्रतिवादींवर मागील झालेल्या कारवाईत जामीनदार झालेल्यांवर कायदेशीर कारवाई करावी, मी व माझे कुटुंब दहशतीत जीवन जगत आहोत, त्यामुळे माझ्या व कुटुंबाच्या जीवितास संरक्षण द्यावे, मी मानसिक तणावात असून मला न्याय न मिळाल्यास मला आत्महत्येशिवाय पर्याय नाही असा इशारा दिला होता. हा व्हिडिओ सप्तशृंगगड येथील पत्रकार सोमनाथ मानकर यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी पत्रकार किरण आवारे यांना

व त्यांनी सदर व्हिडिओ धानोरे येथील पोलीस पाटील अरुण गुजर यांच्याकडे

> व्हायरल व्हिडिओच्या माध्यमातून समोर आलेली बाब लक्षात घेता महसूल व पोलीस प्रशासनाने तातडीने समन्वय साधून दोन्ही पक्षांची सविस्तर बाजू ऐकून घेतली. कायद्याच्या चौकटीत राहून, शांततेच्या मार्गाने शेतरस्त्याचा वाद तात्पुरता निकाली काढण्यात आला असून पुढील कायदेशीर निर्णय होईपर्यंत कुणीही हस्तक्षेप करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.
>
> मा.विशाल नाईकवाडे
> तहसिलदार, निफाड

पाठवून मदतीचे आवाहन केले. त्यानंतर पोलिस पाटील गुजर यांनी तात्काळ हालचाली करत लासलगाव पोलीस ठाणे प्रभारी भास्करराव शिंदे यांना प्रकरणाची माहिती दिली. भास्करराव शिंदे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखत पोलीस हवालदार डी.डी.जाधव व सागर आरोटे यांचेसह तातडीने धानोरे येथे भेट देऊन दोन्ही बाजूंची वस्तुस्थिती जाणून घेतली. मात्र, हे प्रकरण महसुली स्वरूपाचे असल्याने स.पो.नि.भास्करराव शिंदे यांनी निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्याशी समन्वय साधत मार्गदर्शन घेतले. तहसिलदार मा. विशाल नाईकवाडे यांच्या सूचनेनुसार ग्राममहसूल अधिकारी शुभम पाटसकर, पोलीस पाटील अरुण गुजर, सागर गायकवाड, ग्रामस्थ, महसूल व पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत दोन्ही शेतकऱ्यांची सविस्तर बाजू ऐकून घेण्यात आली. प्रशासनाने तब्बल पाच तास वेळ देऊन कायदेशीर चौकटीत आणि शांततेच्या मार्गाने चर्चा करून शेतरस्त्याचा वाद निर्णयपूर्वक मिटवण्यात आला. पुढील कायदेशीर निर्णय येईपर्यंत या प्रकरणात हस्तक्षेप न करण्याचा वादी व प्रतिवादी यांना इशारा देण्यात आल्याने पीडित शेतकऱ्याला तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

## अजितदादा पवार यांचे दुःखद निधन झाल्याची वार्ता कळताच उमरीची बाजारपेठ कडकडीत बंद ठेवत नागरीकांनी श्रद्धांजली वाहिली

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर / रूपेशकुमार ग.श्रीरामवार :** राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान दुर्घटनेत बुधवारी सकाळी निधन झाले. ही वार्ता उमरी शहर व तालुक्यात समजल्यानंतर उमरी शहरातील व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद ठेवून दादांना श्रद्धांजली अर्पित केली.उमरी तालुका राष्ट्रवादीच्या वतीने उपनगराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर यांच्या उपस्थितीत नगरसेवक , व्यापारी, नागरिक,पत्रकार यांनी दुपारी 12 वाजता उमरी मोढा भागात अजितदादा यांना श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सभापती शिरिषभाऊ देशमुख गोरठेकर, नगराध्यक्षा शकुंतलाताई भगवान मुदीराज, उपनगराध्यक्ष कैलासभाऊ गोरठेकर,




माजी नगराध्यक्ष प्रविणभाऊ सारडा, सुभाषराव गोरठेकर, अनिल दर्डा, गटनेता राजेश जाधव, गजानन श्रीरामवार ,नगरसेवक विष्णू पंडित, दामोदर पंडित, विष्णु अट्टल, शेख रशीद सेठ, सय्यद फारुख सेठ, साहेबराव पाटील,शिंदे, नगरसेवक साईनाथ जमदाडे, अनुसयाबाई कटकदवणे, संदीप चंदनवार, वसिम कुरेशी, इरबा शेळके, बाबु बेग, बाळु शिंदे, अशोक झडते, रतन खंदारे, विक्की रणनवरे, खांडरे, नरसिंग मुक्कावार, नागेश बट्टेवाड, दिगांबर मतलवाड यांच्यासह व्यापारी, पत्रकार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## योगाच्या बळावर नवजीवन; बाबा रामदेवांच्या सान्निध्यात गोपाल पाटील राऊत यांचा प्रेरणादायी अनुभव

**रिसोड प्रतिनिधी/रणजितसिंह/ ठाकुर मालेगाव :** योग गुरु बाबा रामदेव यांच्या सान्निध्यात हरिद्वार येथील योग ग्राममध्ये आहार-विहार व योग यांचे सात दिवसीय प्रशिक्षण घेत असताना गोपाल पाटील राऊत यांनी आपला प्रेरणादायी अनुभव कथन केला. गंभीर आजारातून योगाच्या माध्यमातून मिळालेल्या आरोग्याच्या नव्या उमेदीने अनेकांसमोर त्यांनी आशेचा किरण दाखवला. गोपाल पाटील राऊत यांनी सांगितले की, सुमारे सहा महिन्यांपूर्वी त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीनंतर एन्जिओग्राफी व एन्जिओप्लास्टी करण्यात आली. त्या वेळी डॉक्टरांनी



बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला दिला होता. मात्र, शस्त्रक्रियेतील जोखमी लक्षात घेता त्यांनी योगाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

यानंतर योग गुरु बाबा रामदेव यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित योग, प्राणायाम तसेच योग्य आहार-विहाराचा अवलंब केल्यामुळे आज आपण पूर्णतः तंदुरुस्त असल्याचा विश्वास गोपाल पाटील राऊत यांनी व्यक्त केला.

चार महिने मरणाच्या छायेत असलेला मी आज आठ महिने उलटूनही निरोगी आहे, असे भावनिक शब्दांत त्यांनी सांगितले. आपल्या अनुभवातून संदेश देताना गोपाल पाटील राऊत म्हणाले, कोणताही आजार आला तरी त्याला घाबरू नका. धैर्याने सामना करा, योगाचा अवलंब करा आणि त्याचबरोबर डॉक्टरांचा सल्ला घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. योगामुळे जीवनशैलीत सकारात्मक बदल घडून आरोग्य सुधारू शकते, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

योग गुरु बाबा रामदेव यांच्या सान्निध्यातील या प्रशिक्षणाने अनेकांना प्रेरणा मिळत असून, योग व आधुनिक वैद्यकीय सल्ल्याची सांगड घालून निरोगी जीवन जगण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे.

## दक्षिण पूर्व मध्य रेलवे, नागपुर मंडल के दरेकसा स्टेशन में कचारगढ़ मेला 2026 के अवसर पर गाड़ी संख्या 11701/11702 रायपुर-जबलपुर-रायपुर एक्सप्रेस का अस्थायी ठहराव

दैनिक युवक आधार

प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :

दपूमरे, नागपुर मंडल – 29 जनवरी 2026 दक्षिण पूर्व मध्य रेलवे के नागपुर मंडल के अंतर्गत दरेकसा स्टेशन पर दिनांक 30 जनवरी 2026 से 03 फरवरी 2026 तक प्रसिद्ध कचारगढ़ मेला 2026 का आयोजन किया जा रहा है। यह मेला धार्मिक, सांस्कृतिक एवं सामाजिक दृष्टि से अत्यंत महत्वपूर्ण है, जिसमें महाराष्ट्र सहित छत्तीसगढ़, मध्यप्रदेश एवं अन्य समीपवर्ती राज्यों से बड़ी संख्या में श्रद्धालुओं एवं पर्यटकों के आगमन की संभावना रहती है।

श्रद्धालुओं की सुविधा, सुरक्षित एवं सुगम रेल यात्रा सुनिश्चित करने के उद्देश्य से रेलवे प्रशासन द्वारा यात्रियों की बढ़ती भीड़ को ध्यान में रखते हुए गाड़ी संख्या 11701/11702 रायपुर–जबलपुर–रायपुर एक्सप्रेस का दरेकसा स्टेशन पर अस्थायी ठहराव प्रदान किया गया है। इससे मेले में आने-जाने वाले यात्रियों को विशेष लाभ मिलेगा तथा क्षेत्रीय आवागमन और अधिक सुचारु होगा।

**अस्थायी ठहराव का विवरण इस प्रकार है**

1. गाड़ी संख्या 11701 रायपुर–जबलपुर एक्सप्रेस दरेकसा स्टेशन पर आगमन - 16.35 बजे एवं प्रस्थान - 16.37 बजे I

2. गाड़ी संख्या 11702 जबलपुर–रायपुर एक्सप्रेस दरेकसा स्टेशन पर आगमन - 11.11 बजे एवं प्रस्थान - 11.13 बजे I

रेल प्रशासन द्वारा यात्रियों से अनुरोध है कि वे यात्रा से पूर्व अद्यतन समय-सारिणी की जानकारी प्राप्त कर अपनी यात्रा की योजना बनाएं।

## प्रा.दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार श्रीरामवार यांचा प्रजासत्ताक दिनी उमरी तहसीलदार व प्रशासनाच्या वतीने विशेष सन्मान संम्पन

**दैनिक युवक आधार**

**उमरी / वार्ताहर :** नांदेड येथे महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग एवं राज्यस्तरीय समागम समिती, महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र शासन आयोजित "हिंद-दी-चादर" श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वा शहीदी एवं श्री गुरु गोबिंद सिंघ जी ३५० वा गुरतागद्दी शताब्दी समागम सोहळयास उमरी तालुक्यातील एकमेव मानो विकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान या संस्थेच्या पथकांनी उत्कृष्ट स्वयंसेवी सेवा दिल्या बद्दल 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनी उमरी तहसील प्रशासन तथा तहसीलदार सौ.मंजुषा भगत, नायब तहसीलदार संजय सोलंनकर यांच्या वतीने मानो विकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान चे




राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार श्रीरामवार यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित उमरी तहसीलदार सौ.मंजुषा भगत, नायब तहसीलदार संजय सोलंनकर, रामचंद्र देसटेवाड , अशोक संगेवार, सुरेश मराठे, रुद्र करपे, नदीम बेग, साईप्रसाद करपे , उमरी येथील स्वातंत्र्य सैनिक वारसदार, माजी सैनिक, प्रशासकीय अधिकारी अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते..

## सन्मती अभियांत्रिकी महाविद्यालयात रोजगार मेळावा उत्साहात!

### ७३ उमेदवारांचा सहभाग, ७ जणांची प्राथमिक निवड

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** सन्मती अभियांत्रिकी महाविद्यालय व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ जानेवारी रोजी महाविद्यालयाच्या आवारात प्लेसमेंट ड्राईव्ह (रोजगार मेळावा) उत्साहात पार पडला.

कार्यक्रम मुकुंद एज्युकेशन सोसायटीच्या सचिव अॅड. वैशाली वालचाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी महाविद्यालयाचे संचालक प्रसन्न वालचाळे व नीरज वालचाळे उपस्थित होते.

या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये एकूण ७३ उमेदवारांनी सहभाग नोंदविला, त्यापैकी ७ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. निवड झालेल्या उमेदवारांना पुढील मुलाखत व नियुक्ती प्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शनही देण्यात आले.




कार्यक्रमात महाविद्यालयाचे डॉ. सचिन व्यवहारे, इतर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या कौशल्य विकास अधिकारी वैशाली पवार व प्रदीप नेमाडे यांनी सहभाग घेतला.

हा रोजगार मेळावा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्लेसमेंट ऑफिसर गजानन चव्हाण तसेच जिल्हा कौशल्य विकास केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. या उपक्रमामुळे

> १)रोजगार मेळाव्यातून विद्यार्थ्यांना संधी!
> २)७३ उमेदवारांचा सहभाग
> ३)७ जणांची प्राथमिक निवड
> पुढील मुलाखतीसाठी मार्गदर्शन
> विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला

विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मोलाची मदत झाली आहे. कार्यक्रमाचे संचालन संगणक अभियांत्रिकी शाखेच्या निसर्गा लाहे यांनी केले.

## शिवर बु ग्रामपंचायत चा विकास टक्केवारी करिता रखडला - ग्रामपंचायत सदस्य पंकज कदम यांचा आरोप

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे/तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** दर्यापूर ग्रामपंचायत शिवर येथे मागील पाच महिन्या पासून अनुजाती - नवबुद्ध घटकाच्या वस्तीसुधार ( दलित वस्ती ) योजनेअंतर्गत तेरा लाख रुपये मंजूर झाले आहेत तरी अजून पर्यंत कोणत्याही निवीदा प्रक्रिया अद्याप पर्यंत केली नाही या अगोदर 13/10/25 रोजी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांना आचारसहिता लागण्या अगोदर व ग्रामपंचायत चा कार्यकाल संपण्याअगोदर निविदा काढण्याकरिता पत्र दिले होते

तसेच गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडे तोंडी पाठपुरावा केला तसेच प्रत्येक मासिक सभेत मुद्दा उपस्थित केला तोंडी पाठपुरावा करत असताना ग्रामपंचायत अधिकारी यांनी 12/1/2026रोजी निवेदा ऑनलाइन केल्याची तोंडी माहिती दिली परंतु



मी त्यांना लेखी अर्ज करून निविदा ऑनलाइन प्रक्रियेची माहिती मागितली आज पंधरा दिवस होऊन सुद्धा माहिती मिळाली नाही याचाच अर्थ शिवर ग्रामपंचायतचा निविदा टक्केवारीसाठी रखडल्या आहेत का तसाच शिवर ग्रामपंचायत च्या सरपंच यांचा मनमानी कारभार चालू आहे तसा अहवाल ही आला कामाचे नियमबाह्य ठराव घेणे तसेच ग्रामपंचायत च्या नावाने आलेले पत्र मासिक सभेत न ठेवता सरपंच

स्वतःच्या स्वाक्षरीने परस्पर नियमबाह्य कोणताही ठराव न घेता वाणिज्य प्रयोजनाकरता ना हरकत नियमबाह्य पत्र देणे कर्मचाऱ्यावर वचक नसणे 26 जानेवारीला ग्रामसभा न घेणे या सर्व गोष्टीत सरपंचाचा मनमानी कारभार चालू आहे,

सरपंच यांनी नियमबाह्य काम केल्याचे स्पष्ट झाले आहे. तरी सरपंचावर लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी,ज्या नियमबाह्य गोष्टी झालेल्या आहेत त्यात सरपंचाचा आर्थिक व्यवहार झालेले आहे त्याशिवाय ह्या नियमबाह्य पत्रव्यवहार ठराव भ्रष्टाचारी लोकांना पाठीशी घालणे ह्या गोष्टी घडू शकत नाही.

# दादासाहेब फाळके पुरस्कार सोहळा दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही कलाकारांच्या कलागुणांचा गौरव करणारा भव्य दादासाहेब फाळके पुरस्कार सोहळा दिनांक २५ जानेवारी रोजी मुंबई येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे दिमाखात पार पडला.

या सोहळ्यास चित्रपट, नाट्य, संगीत, साहित्य, समाजसेवा, वैद्यकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर व कलाकारांची उपस्थिती लाभली.

दादासाहेब फाळके चित्रपट युनियन ही संघटना महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये कलाकारांच्या हक्कांसाठी, न्यायासाठी आणि कलावंतांच्या सन्मानासाठी सातत्याने कार्यरत आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित म्हामुणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कलाकारांना व्यासपीठ देण्याचे आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्याचे कार्य प्रभावीपणे सुरू आहे.



यावर्षीही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सुप्रसिद्ध कलाकार, समाजसेवक, लेखक, दिग्दर्शक, गायक, नर्तक, तंत्रज्ञ, पत्रकार आणि संस्थांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**लाइफटाइम अचीव्हमेंट अवार्ड**

रंजनबेन चौहान (महिला)

उस्ताद मकबूल हुसैन खान (पुरुष)

यंदाचे प्रमुख पुरस्कार विजेते (निवडक):

जयशीला सालियन – कॉन्सेप्ट आर्टिस्ट व कॅरेक्टर डिझायनर

युवराज बिसेन – सर्वश्रेष्ठ लेखक

गौरी त्रिपाठी – सर्वश्रेष्ठ गायिका

रवि नाईक – सर्वश्रेष्ठ गायक

दिलीप सेन – सर्वश्रेष्ठ संगीत दिग्दर्शक

विजय कलमकार – बेस्ट डायरेक्टर

विजय पाटकर – बेस्ट एक्टर

रोहिणी हट्टंगडी – सर्वश्रेष्ठ अभिनेत्री

शिवाजी मोरे, सुनील गोडबोले, अरुण नलवाडे, दीपक खांडेकर – सर्वश्रेष्ठ अभिनेता

तन्वी निलेश भडाणे – बेस्ट चाइल्ड एक्ट्रेस

दिवेस शिरवंदकर – सर्वश्रेष्ठ मिमिक्री कलाकार

रीमा अनिल महल्ले – भरतनाट्यम नृत्य

विजया कदम – लावणी राणी

विलास बाडे – सर्वश्रेष्ठ अँकर (मीडिया)

अन्नासाहेब एकनाथ अहेर – उत्कृष्ट पत्रकार

समाजसेवा, शिक्षण, वैद्यकीय व विशेष योगदान पुरस्कार:

देवीदास अनंत भुजबल, सुरेश रंगनाथ भट, देवेंद्र पंडित, नीलेश सोनावणे – समाज भूषण

राजेंद्र गजानन पाटील, शिवाजी थोरवे – समाज रत्न

डॉ. चेतन कलाल – वैद्यकीय क्षेत्रातील योगदान

निदान विश्व हेल्थ सर्व्हिस – आरोग्य सेवा योगदान

प्रो.डॉ. दिलीप जाधव – शैक्षणिक क्षेत्रात योगदान

डॉ. नंदकुमार जाधव – शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

साईनाथ पवार – दिव्यांग क्षेत्रातील विशेष योगदान

ब्लूबेरी इव्हेंट्स कंपनी प्रोप्रायटर विनोद यादव आणि निलेश गायकवाड यांना बेस्ट इन इव्हेंट ऑर्गनायझेशन अवॉर्ड, अभिनेता विकास वायाळ उत्कृष्ट डायरेक्टर व कलाकार, मुकुंद कांबळे प्रिंट मीडिया

यासह अनेक कलाकार, संस्था व व्यावसायिकांना विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल गौरविण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा म्हणजे केवळ सन्मान नव्हे, तर कलाकारांच्या कष्टांना मिळालेली प्रेरणादायी दाद, भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून संपूर्ण भारतात कौतुक होत आहे.

---

## आई फाउंडेशनकडून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी खाऊवाटप व शिक्षण सहकार्याचा मानवतावादी संकल्प

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड :** "॥ हीच अमुची प्रार्थना अन हेच अमुचे मागणे — माणसाने माणसाशी माणसासम वागणे ॥"

या हृदयस्पर्शी विचारांना कृतीत उतरवत, दिव्यांग बांधवांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या आई फाउंडेशन या सामाजिक संस्थेने मानवतेचा जिवंत संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम राबविला. नववर्ष स्वागत आणि प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने, समाजातील सर्वात वंचित घटक असलेल्या आदिवासी पाड्यांवरील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खाऊवाटप करण्यात आले. दि. २७ जानेवारी २०२६ रोजी विंधणे आदिवासी वाडी, पिरवाडी आदिवासी वाडी, कोप्रोली आदिवासी वाडी,येथील शाळांमधील लहानग्यांच्या चेहऱ्यावर खुललेले आनंदी हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले. हा केवळ खाऊवाटपाचा कार्यक्रम नव्हता, तर "तुम्ही एकटे नाही" हा विश्वास देणारा भावनिक आधार होता.

दिव्यांग व्यक्तींनी स्वतःच्या अडचणींवर मात करत समाजासाठी उभे राहण्याचा घेतलेला हा निर्धार खऱ्या अर्थानेप्रेरणादायी आहे. आई फाउंडेशन ही संस्था दिव्यांग बांधव तसेच आदिवासी व वंचित घटकांच्या उत्कर्षासाठी मार्गदर्शन,



सहकार्य आणि सामाजिक भान जागृत करण्याचे सातत्याने कार्य करत आहे.संस्थेने यापूर्वीही पूरग्रस्तांना मदत, उरणमधील गरजू दिव्यांगांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप,

दिव्यांग बांधवांना वेळोवेळी मार्गदर्शन असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. यावेळी खाऊवाटपासोबतच प्रत्येक वाडीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहकार्य करण्याची भावना संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली. संस्थेच्या प्रतिनिधींनी भावनिक शब्दांत सांगितले —

"दिव्यांगत्व ही मर्यादा नाही, तर जिद्द, आत्मविश्वास आणि सेवाभावाची ओळख आहे. आम्ही मदत करत नाही, आम्ही नातं जोडतो."

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे शिलेदार —

मदन पाटील (अध्यक्ष), राजेंद्र पाटील (उपाध्यक्ष), रणिता ठाकूर (सचिव), महेश पाटील (खजिनदार), सदस्य उमेश पाटील, संदेश राजगुरू, योगेश पाटील, नितीन सांगवीकर, राकेश पाटील यांनी अथक परिश्रम घेतले.तसेच

रामकृष्ण थळी (पिरवाडी आदिवासी वाडी ), कल्पेश ठाकूर (कोप्रोली वाडी), नरेश पाटील आणि रमण पंडित (विंधणे आदिवासी वाडी )या शिक्षकांचे सहकार्य लाभले. याशिवाय गणेश पाटील (अध्यक्ष, ग्रामस्थ मंडळ दादरपाडा) चंद्रकांत पाटील (सहव्यवस्थापक, एच.ओ.सी. कंपनी, रसायनी) यांचेही मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रम समाजाला एक सुंदर संदेश देऊन गेला -मानवतेची खरी ओळख मदतीत नसून, समानतेच्या भावनेत आहे.आई फाउंडेशन पुढील काळातही शिक्षण, मार्गदर्शन व सामाजिक उन्नतीसाठी असेच उपक्रम राबवत राहणार आहे. असे मत संस्थेच्या प्रत्येक शिलेदारांनी व्यक्त केले.

---

## पाटोद्यात उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना सर्वपक्षीय भावपूर्ण श्रद्धांजली, उपस्थितांना अश्रू अनावर...

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा नगर पंचायत कार्यालयासमोर पाटोद्यातील सर्वपक्षीय नेते, विविध पक्षांचे तालुकाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी आणि पत्रकार यांच्या वतीने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी संपूर्ण पाटोदा तालुक्यात अत्यंत शोकाकुल वातावरण पाहायला मिळाले. नेत्यांच्या डोळ्यांत दाटले अश्रू श्रद्धांजली सभे दरम्यान उपस्थितांच्या भावनांचा बांध फुटला, नगरसेवक संतोष दादा जाधव आणि मौलाना हे आपल्या भावना व्यक्त करताना अत्यंत भावूक झाले, त्यांना अश्रू अनावर झाले होते. अजित दादांच्या आठवणीने संपूर्ण परिसर हेलावून गेला होता. मान्यवरांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना दिपक दादा घुमरे (तालुकाध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस), अजित दादा म्हणजे आमचा खंबीर आधारवड होते. शब्दाला जागणारा आणि विकासाचा ध्यास घेतलेला असा लोकनेता पुन्हा होणे अशक्य आहे. आज संपूर्ण महाराष्ट्राने एक धडाडीचे नेतृत्व गमावले असून ही पोकळी कधी ही भरून निघणार नाही. त्यांच्या जाण्याने आमचे कधी ही भरून न निघणारे नुकसान झाले



आहे."भूषण जाधव(राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गट) "राजकीय मतभेद जरी असले तरी अजित दादाच्या कामाची पद्धत आणि प्रशासनावरील त्यांची पकड ही नेहमीच कौतुकास्पद होती. महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत त्यांचे योगदान मोठे आहे. आज एका कार्यक्षम नेतृत्वाचा असा निरोप घेणे मनाला चटका लावून जाणारे आहे. "सौ. दिपाली जाधव (नगराध्यक्षा,पाटोदा) "दादांनी नेहमीच शहराच्या विकासासाठी झुकते माप दिले, कामाची शिस्त आणि स्पष्टवक्तेपणा ही त्यांची ओळख होती. त्यांच्या जाण्याने पाटोद्याचा विकास हरपला आहे. "बाबुराव जाधव (नगरसेवक): "सामान्य कार्यकर्त्याला बळ देणारा हा महान नेता होता. प्रशासनावरील पकड आणि लोकांच्या प्रश्नांची जाण या मुळे त्यांनी प्रत्येकाच्या मनात स्थान निर्माण केले होते. या श्रद्धांजली सभेला पाटोदा शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी विविध संघटनेचे प्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी ही आपल्या श्रद्धांजलीपर भावना व्यक्त केल्या या वेळी मोठ्या संख्येने पाटोदेकर, विविध पक्षाचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, व्यापारी बांधव उपस्थित होते. सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून लाडक्या नेतृत्वाला आदरांजली वाहिली. पाटोदा तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून या वेळी मोठी हळहळ व्यक्त करण्यात आली.

---

## सुकृतम आनंद सेवा संस्थेच्या वतीने दुर्गम आदिवासी वाड्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे :** भारतीय प्रजासत्ताकाचा ७७ वा वर्धापन दिन देशात सर्वत्र साजरा केला जात असताना मुंबई येथील सुकृतम सेवा संस्था लालबाग या संस्थेतील कार्यकर्त्यांनी सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी खालापूर तालुक्यातील अतिदुर्गम करंबेळी ठाकूरवाडी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत जाऊन खडई धनगर वाडा आणि करंबेळी ठाकूरवाडी येथील दोन शाळानतील शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग,वह्या पेन, पेन्सिल, मुलींसाठी हेअर बँड, चॉकलेट्स आणि इतर खाऊचे वाटप करून प्रजास्ताक दिन साजरा केला. स्वातंत्र्याच्या 77 वर्षा नंतर ही रस्त्यांसारख्या मूलभूत सुविधेपासून वंचित असलेल्या करंबेळी ठाकूरवाडीत आलेल्या मुंबईतील सर्व युवा कार्यकर्त्यांनीं मुंबईपासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या या आदिवासी वाड्यांमध्ये मूलभूत सुविधा नसल्याचे पाहून आश्चर्य व्यक्त केले तर ह्याच सुविधांसाठी



सातत्यपूर्ण पाठपुरावा करणाऱ्या ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांचे जाहीर आभार मानत आदिवासी बांधवांच्या संघर्षात यापुढे सुकृतम आनंद सेवा संस्थेचे कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे सुकृतमचे प्रमुख निलेश घारे यांनी आश्र्वासित केले. यावेळी खरिवली ग्रामपंचायत सरपंच सुंदर पवार, उपसरपंच, सुशांत विचारे, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, राजू पाटील, ग्रा.प. सदस्या सौ देवकी माडे, करंबेळी ठाकुरवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मोहन माडे, शाळेचे मुख्याध्यापक विष्णू राठोड उपशिक्षक श्री विनायक भांड, खडई शाळेचे मुख्याध्यापक अमोल मस्के, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष संतोष घाटे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत पाटील, अंकुश माडे, गावातील ज्येष्ठ नागरिक श्री धाऊ माडे (मा. सरपंच) कमलाकर माडे, हिरामण माडे, भास्कर माडे,केशव माडे यांच्यासह सुकृतम् आनंद सेवा संस्थेचे नीलेश, घारे,अमोल पारठे, तानाजी खाटपे, प्रथमेश डावल, विशाल तळेकर,अमर करंजे, प्रियांका करंजे, संदेश नानारकर, साहिल नाईक,सुभाष मालुसरे आदी मान्यवर उपस्थित होते.

---

## दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार ? जयंत पाटील

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** दिवंगत अजितदादा पवार यांच्या नंतर उत्तराधिकारी कोण ? या चर्चेला राजकिय वर्तुळात आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जोरदार सुरुवात झाली असताना स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी एकत्र यावेत.यासंबंधी माझ्यात आणि अजितदादा पवार यांच्यासोबत बऱ्याच बैठका ही झाल्या होत्या. असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) नेते जयंत पाटील यांनी देवून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस केव्हा ही एकत्र येवू शकतात. असे संकेत दिले.स्व.अजितदादा पवार यांच्या अचानक जाण्याने अजितदादा यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच जिल्हा परिषद निवडणूकांनंतर अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याचे शक्यता वर्तविण्यात येत होती. तसेच त्या अनुषंगाने अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्याकडून तसे संकेतही देण्यात येत होते. या सगळ्या घडामोडीत राजकारणात नव्याने उतरलेल्या सुनेत्रा पवार यांच्या राजकिय प्रवासाचा निर्णय घेण्यास अजित पवार सक्षम होते. परंतु आता अजित पवार यांचाच अपघाती मृत्यू झाल्याने अजित पवार यांचा गट कोणाचे नेतृत्व मान्य करणार कोण ते नेतृत्व सांभाळणार यावरून अजित पवार यांच्या मृत्यूची घटना जाहिर होताच विचारण्यात येत होता. मात्र शरद पवार यांची काँग्रेसी पद्धतीची रणनीती पाहता अजित पवार यांच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली पोकळी निश्चितच वेगळ्या पद्धतीने भरून निघणार असल्याचा शक्यता वर्तविण्यात येत होती. मात्र अजित पवार यांच्या पक्षाचे मंत्री यांच्या वक्तव्याने मात्र भलताच रंग या परिस्थितीत भरला गेल्याने पुढे काय अशी एक प्रश्नचिन्हांकीत परिस्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अजित पवार यांच्या पार्थिवाला मुखाग्नी देताच अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीने एकत्र यावे आणि सुनेत्रा पवार यांना अजित पवार यांच्या जाण्याने रिक्त झालेले उपमुख्यमंत्री पद द्यावे अशी मागणी केली.

---

## इंदापूर तालुक्यात अपक्ष उमेदवारीने राष्ट्रवादीची डोकेदुखी वाढणार ?

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे जोर धरू लागले असतानाच इंदापूर तालुक्यात राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अपेक्षित उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर अपक्ष उमेदवारी दाखल केल्यामुळे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेससमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.इंदापूर तालुक्यातील जवळपास सर्वच जिल्हा परिषद व पंचायत समिती गटांमध्ये राष्ट्रवादीतील जुने, निष्ठावंत कार्यकर्ते उमेदवारीपासून वंचित राहिले. यामुळे 'पक्षासाठी झटायचे, पण निवडणुकीत संधी मात्र घराण्यालाच?' असा सवाल कार्यकर्त्यांमधून उपस्थित होत आहे.

परिणामी अनेकांनी थेट अपक्ष मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला असून, ही बंडखोरी तालुक्यात उघडपणे दिसून येत आहे.विशेष म्हणजे अजित पवार गट आणि शरद पवार गट अशा दोन्ही गटांतील कार्यकर्ते या नाराजीच्या फटक्यात सापडले आहेत. गटबाजी, समीकरणे आणि वरिष्ठांची मर्जी यामध्ये स्थानिक कार्यकर्त्यांना डावलल्याची भावना तीव्र होत चालली आहे. त्यामुळे 'आपलाच कार्यकर्ता आपल्याच उमेदवाराविरोधात उभा ठाकतोय' अशी परिस्थिती राष्ट्रवादीसमोर निर्माण झाली आहे.

तालुक्यातील राजकीय जाणकारांच्या मते,अपक्ष उमेदवार केवळ मतविभाजन करणार नाहीत,तर काही गटांत थेट निकालावरही प्रभाव टाकू शकतात. विशेषतःग्रामीण भागात उमेदवाराची वैयक्तिक ओळख,कामाचा इतिहास आणि स्थानिक नाती महत्त्वाची ठरत असल्याने पक्षाचे चिन्ह दुय्यम ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान नागरिकांमध्येही या घडामोडींवर चर्चा रंगली आहे."पक्ष बदलतात,गट बदलतात,पण कार्यकर्त्यांची किंमत शून्यच राहते,"अशी भावना अनेक ठिकाणी व्यक्त होत आहे.याचा थेट परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर आणि सत्ताधाऱ्यांच्या गणितांवर होऊ शकतो. एकूणचअपक्ष उमेदवारीच्या वाढत्या लाटेमुळे इंदापूर तालुक्यातील निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. ही बंडखोरी राष्ट्रवादी काँग्रेससाठी केवळ डोकेदुखी ठरणार की सत्तेच्या समीकरणांनाच हादरा देणार,याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## नागपुरात घरफोडी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना हुडकेश्वर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

### साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादक :** हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवनगर परिसरात दिवसाढवळ्या झालेली घरफोडीची घटना उघडकीस आली असून पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. मो. फहीम आणि मो. खालीद अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून ते यशोधरा नगर भागातील रहिवासी आहेत.

ही घटना ११ जानेवारी २०२६ रोजी घडली होती. फिर्यादी ईश्वर चांदेकर हे कामावर गेले असताना आणि त्यांची पत्नी शेजारी गेल्याचा फायदा घेत चोरट्यांनी घराच्या किचनचा कडी-कोडा तोडून आत प्रवेश केला होता. चोरट्यांनी कपाटातील लॉकरमधून सोन्याचे मंगळसूत्र, अंगठ्या आणि चेन असा सुमारे ४८ ग्रॅमचा ऐवज लंपास केला होता.

या घटनेचा तपास करताना हुडकेश्वर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीचा आधार घेतला. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पोलिसांनी दोन्ही आरोपींना सापळा रचून ताब्यात घेतले. पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या चौकशीत आरोपींकडून ३३ ग्रॅम सोन्याची लगड आणि गुन्ह्यात वापरलेली लाल रंगाची ॲक्टिव्हा गाडी, असा एकूण ३ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल आणि पोलीस उप आयुक्त रश्मिता राव यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक हृदयनारायण यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक पपीन रामटेके आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

## सरकार झोपलेलं, गावकरी जागलेत; पण गरिबांच्या लेकरांच्या भविष्याचं काय?

### गावकरी गोळा करतायत वर्गणी, गरिबांच्या लेकरांचं शिक्षण वाऱ्यावर!

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर**

**घाटंजी:** आजच्या काळात जिथे शिक्षणाच्या मोठ्या गप्पा मारल्या जातात, तिथे घाटंजी तालुक्यातील कुर्ली आणि चिखलवर्धा सारख्या गावांमध्ये जिल्हा परिषद शाळांची अवस्था पाहून डोळ्यात पाणी येते. या शाळांमध्ये शिक्षकच नसल्यामुळे गावकऱ्यांनी आता स्वतःच्या घामाच्या कमाईतून वर्गणी गोळा करून शिक्षकांची सोय केली आहे. सरकार आणि प्रशासनासाठी यापेक्षा शरमेची गोष्ट दुसरी कोणती असू शकते?



शाळेत शिकवण्यासाठी शिक्षक नाहीत आणि जे आहेत ते राजकीय नेत्यांच्या मदतीने आपल्या बदल्या सोयीच्या ठिकाणी करून घेत आहेत. गावात यायला कोणी तयार नाही, त्यामुळे एकाच शिक्षकावर संपूर्ण शाळेचा भार पडला आहे. यामुळे मुलांचे शिक्षण पूर्णपणे विस्कळीत झाले असून पालकांमध्ये संतापाची लाट आहे.

प्रशासनाचा हा कारभार पाहिला तर असे वाटते की त्यांना जिल्हा परिषद शाळा वाचवण्यात रस नसून, फक्त खाजगी शाळांना मोठे करायचे आहे.

गरिबांच्या मुलांनी काय शिकायचेच नाही का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. सरकारने आपली झोप सोडावी आणि या शाळांकडे लक्ष देऊन त्वरित शिक्षक भरती करावी, अन्यथा विद्यार्थ्यांचे भविष्य कायमचे अंधारात जाईल.

## दारू न दिल्याने तळोजात दोन ठिकाणी हाणामारी, आरोपी फरार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** तळोजा वसाहतीत दारूच्या दुकानासमोर सलग दोन मारहाणीच्या घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दारू खरेदी अथवा पिण्यास नकार दिल्याच्या कारणावरून अनोळखी युवकांनी दोन तरुणांना बेदम मारहाण केल्याचे उघड झाले असून, या दोन्ही प्रकरणांची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेनंतर आरोपी युवक पसार झाले असून तळोजा पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. उघड्यावर मद्यपान करणारे व मद्यपींचा त्रास हा तळोजा परिसरातील रहिवाशांसाठी पुन्हा एकदा गंभीर प्रश्न बनला आहे.

पहिल्या घटनेत तळोजा फेज-2 मधील कुणाल वाईन्ससमोर घडली. येथे 30 वर्षीय तरुण व त्याचा मित्र उभे असताना दोन अनोळखी युवकांनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. आरोपींनी ॲल्युमिनियमच्या पट्टीने डोक्यावर, पाठीवर आणि हातांवर जबर मारहाण केल्याने दोघेही जखमी झाले. याच दिवशी रात्री दुसरी घटना घडली. खारघर येथे राहणारा 32 वर्षीय तरुण कुणाल वाईन्समधून दारू खरेदी करून घरी जात असताना दोन अनोळखी युवकांनी त्याला अडवले. '30 मिलीलीटर दारूचा पेग पाजणार नाही का?' अशी मागणी आरोपींनी केली. मात्र दारू देण्यास नकार दिल्याने त्यांनी लाथाबुक्यांनी त्याला मारहाण केली. या हल्ल्यात संबंधित तरुणाच्या बरगडी तुटल्या असून तो गंभीर जखमी झाला आहे.

दरम्यान, या मारहाणीत आरोपींनी आपल्या हातातील सोन्याचे ब्रेसलेटही घेतल्याचा संशय पीडित तरुणाने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत व्यक्त केला आहे. दोन्ही घटनांचा तपास तळोजा पोलीस करत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. वाढत्या मद्यपी त्रासावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

तळोजा वसाहतीमधील नागरिकरण झपाट्याने वाढत असून या परिसरासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे सुरू करण्याची मागणी येथील रहिवाशांकडून होत आहे. नवी मुंबई पोलीस विभागाने पोलीस ठाण्यासाठी भूखंड मागणीचा प्रस्ताव सिडको मंडळाकडे दिला आहे. मात्र यासंदर्भात गतिमान पद्धतीने हालचाली होत नसल्याने पोलीस ठाणे सुरू करण्याचा प्रस्ताव बासनात पडून आहे.

## धर्माबाद बंद; उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**पुनम एडके / धर्माबाद:** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांचे दि.२८ जानेवारी रोजी सकाळी बारामतीत विमान लँडिंग करण्याच्या प्रयत्नात असताना झालेल्या अपघातात दुर्दैवी निधन झाले आहे. त्यांनी अभिवादन करण्याकरिता व त्यांना श्रद्धांजली म्हणून दि.२९ जानेवारी रोजी एक दिवस धर्माबाद बंद ठेवण्याचे आवाहन सर्वपक्षीय समितीने



केले आहे. महाराष्ट्रासाठी अहोरात्र झटणारा स्पष्टवक्ता व दमदार नेता म्हणून अजितदादांची ओळख होती. अजितदादा पवार यांनी ६ वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिले होते. त्यांनी ११ वेळा महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प सादर केला होता. त्याला श्रद्धांजली म्हणून महाराष्ट्र शासनाने दि.२८ जानेवारी रोजी एक दिवसाची शासकीय सुट्टी व तीन दिवसाचा शासकीय दुःखवटा जाहीर केला आहे. अजितदादा यांच्यासोबतच पायलट सुमित कपूर, कॅप्टन संभवी पाठक, खाजगी सुरक्षा अधिकारी विधिप जाधव, फ्लाईट अटेंडेंट पिंकी माळी यांचंही या विमान अपघातात निधन झाले आहे. या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि.२९ जानेवारी रोजी एक दिवस धर्माबाद शहर बंद ठेवून अभिवादन करण्याचे आव्हान सर्वपक्षीय पदाधिकांयाच्या व तिने व्यापाऱ्यांना करण्यात आले आहे.

# जागतिक अशांततेतून आर्थिक अस्थैर्याकडे

सध्या जगातील दोन-तीन खंडांमध्ये एकाच वेळी युद्धे सुरू असल्याचे चित्र आहे. लॅटिन अमेरिकेत तेल आणि दुर्मीळ खनिजांच्या लालसेपोटी अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांना कैद करून रातोरात अमेरिकेत नेल्याची घटना घडली. इराणकडील प्रचंड तेल साठ्यांमुळे इराणला ताब्यात घेण्याचे (अगदी सशस्त्र मार्गानेही) प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येते.

रशियाच्या सीमेलगत असलेल्या युक्रेनकडेही युरोप, रशिया आणि अमेरिका या सर्वांचे लक्ष आहे. 'युरोपचे धान्यकोठार' असलेल्या या देशाची गेली दोन वर्षे युरोपच्या मदतीने रशियाविरुद्ध अस्तित्वाची लढाई सुरू आहे. मध्यपूर्वेत, इस्रायल पॅलेस्टिनी भूभाग पूर्णतः ताब्यात घेण्याच्या प्रयत्नात आहे. त्याच वेळी अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पॅलेस्टाइन पर्यटनासाठी विकसित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आशिया खंडात जपानलगतच्या समुद्रात चीन जलआक्रमणाच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत. एकूण सध्या संपूर्ण जगावर या ना त्या प्रकारे युद्धाच्या भीतीचे सावट आहे.

दुसरीकडे, आता पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धाप्रमाणे मानवी सैनिक शस्त्रास्त्रांसह प्रत्यक्ष रणांगणावर लढत नाहीत. तर कोणत्या देशाकडे किती प्रगत, दूरवर मारा करणारी आणि विध्वंसक क्षमता असलेली शस्त्रास्त्रे आहेत, याची माहिती प्रसिद्ध केली जात आहे. त्यावरून संबंधित देशांवर दबाव निर्माण करण्याची व विजय मिळविण्याची क्षमता स्पष्टपणे दिसून येते.

आधुनिक युद्धांमध्ये केवळ शस्त्रांच्या बटणावर बोट ठेवले की काही क्षणांतच शत्रुराष्ट्रातील घरे, शाळा, इस्पितळे, सरकारी कार्यालये आणि मानवी जीवन यांचे प्रचंड नुकसान होते. अशा युद्धांमध्ये दोन्ही बाजूंनी प्रत्यक्ष मानवी फौजा रणांगणावर नसतात. पूर्वीची युद्धे मुख्यतः 'मानव विरुद्ध मानव' अशी असत, तर आजची '(परमाणू) शस्त्रे विरुद्ध शस्त्रे' अशी होत असल्याचे दिसते. या विध्वंसाबरोबरच दीर्घकालीन प्रदूषण, तसेच हिरोशिमासारख्या घटनांचे झाले तसे मानवी जीवनावर होणारे दीर्घकालीन परिणाम व विकृती यांचाही गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे.

आज प्रत्येक देश विरोधी राष्ट्राला मुळापासून उखडून टाकू, मागमूसही ठेवणार नाही अशा भाषेचा वापर करत असल्यामुळे या परिस्थितीत किती प्रचंड क्रौर्य दडलेले आहे, याची जाणीव जनतेला होत आहे. प्रादेशिक तसेच जागतिक शांतता जणू काळाच्या ओघात हरवून गेली आहे.



**या परिस्थितीची कारणे**

सध्याच्या युद्धसदृश परिस्थितीला गेल्या ४०-५० वर्षांतील अनेक घटना जबाबदार असल्या, तरी त्या पचवत आणि सामावून घेत मानवी समाज व्यवहार करत आला आहे. मात्र इतिहास हेही सांगतो की काही राज्यकर्त्यांना ही संतुलित व्यवस्था उद्ध्वस्त केल्याशिवाय, आणि आपल्या मनाजोगे संकुचित निर्णय इतरांवर लादल्याशिवाय समाधान मिळत नाही.

जागतिक हिताच्या घोषणा देत उद्दिष्टे मात्र एका देशापुरती ठेवण्याची प्रवृत्ती पूर्वीही दिसून आली आहे. उरल पर्वतरांगेतील विपुल संपत्ती व कच्च्या मालाचे साठे, अफाट जंगलांनी व्यापलेला सायबेरिया आणि युक्रेनची सुपीक भूसपाटी जर्मनीच्या ताब्यात आली, तर जर्मन जनता सुख-समृद्धीत लोळू लागेल, असे उद्गार १२ सप्टेंबर १९३६ रोजी न्युरेंबर्ग येथे हिटलरने काढले होते. डोनाल्ड ट्रम्प यांची सध्याची वक्तव्ये यापेक्षा वेगळी नाहीत. राष्ट्रवादाचा मुखवटा धारण करून साम्राज्यवादाचा अट्टहास यांतून दिसून येतो.

आजच्या परिस्थितीमागील दोन मूलभूत कारणे लक्षात घेण्यासारखी आहेत. एक म्हणजे अमेरिकेचे प्रचंड प्रमाणात वाढलेले सार्वजनिक कर्ज आणि दुसरे म्हणजे 'अमेरिकेला पुन्हा महान करू या' ही घोषणा. एखाद्या देशाने आपले सार्वजनिक कर्ज कमी करावे किंवा आपल्या अर्थव्यवहारांचा विस्तार करावा, यामध्ये काहीही गैर नाही. परंतु इतर देशांवर मनमानी पद्धतीने प्रचंड कर आणि प्रशुल्क लादून ही उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर त्यासाठी आवश्यक असलेले नैतिक अधिष्ठान नष्ट होते आणि त्यातूनच आजसारखी अस्थिर परिस्थिती निर्माण होते.

उदाहरणार्थ, भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर त्यावर जादा प्रशुल्क लावायचे; कोणीही रशियाशी सामान्य व्यापारसंबंध ठेवले तरी अतिरिक्त कर लावायचे; व्हेनेझुएलाकडून तेल घेतले तर दंडात्मक कर आकारायचे; तसेच इराणशी व्यापारसंबंध ठेवले तरी वाढीव कर लावायचे, हे धोरण आंतरराष्ट्रीय नैतिकतेत आणि मुक्तव्यापाराच्या व्यवहारांत कुठेही बसत नाही. आंतरराष्ट्रीय व्यापार खुला असावा, कर कमी असावेत आणि कोणत्याही देशाने जगात कुठूनही वस्तू खरेदी कराव्यात, हा आग्रह जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेच्या वेळी अमेरिकेनेच धरला होता; मग आज त्याच तत्त्वांपासून अमेरिका स्वतःच माघार का घेते, हा प्रश्न उपस्थित होतो.

स्वतःच्या संपत्तीवृद्धीसाठी इतर देशांमधील श्रमिकांना बोलावून घेणे, त्यांच्याकडून रात्रंदिवस काम करून घेणे आणि आर्थिक परिस्थिती थोडीशी कठीण होताच त्याच तरुणांना देशाबाहेर जाण्यास सांगणे—ही कोणत्या प्रकारची नैतिकता आहे? या धोरणांचा परिणाम असा झाला की व्हेनेझुएलाच्या परिसरातील अनेक लॅटिन अमेरिकन देश अमेरिकेच्या विरोधात उभे राहिले.

रशियाच्या तेलविक्रीवर गळचेपी करणे आणि आपल्या देशात येणाऱ्या तयार मालावर अतिशय उच्च दराचे कर लावणे, या अमेरिकेच्या धोरणांमुळेच इतर देशांना परस्पर सलोख्याचे आणि पर्यायी व्यापारसंबंध निर्माण करण्यास प्रवृत्त केले गेले, हे नाकारता येत नाही. याचे उदाहरण म्हणजे भारताने जपान आणि ब्रिटनबरोबर नव्याने केलेले व्यापार करार तसेच युरोपबरोबर झालेला भव्य व्यापार करार. या घडामोडींमधून अमेरिका आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी पडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. 'पुन्हा महान होण्याच्या' अट्टहासापोटी अमेरिकेने आज भारत, चीन, रशिया, इराण आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांशी आर्थिक आणि संरक्षण क्षेत्रात वैमनस्य स्वीकारल्याचे दिसते. परिणामी, अमेरिकेचे सार्वजनिक कर्ज कमी होईल का आणि अमेरिका खरोखरच पुन्हा महान होऊ शकेल का, या दोन्ही उद्दिष्टांवर तिच्याच वर्तनामुळे गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

भारत सध्या अनेक अंगांनी अडचणीत सापडल्याचे चित्र दिसते. उदाहरणार्थ, इस्रायलशी असलेली भारताची मैत्री त्यांच्याकडून तांत्रिक साहाय्यामुळे इतकी घट्ट झाली आहे की पॅलेस्टिनी जनतेवर होत असलेल्या भीषण अन्यायाविरुद्ध भारत उघडपणे बोलू शकत नाही. इराणकडून मिळणाऱ्या तेलाच्या लाभासह चाबहार बंदर (युरोपकडे जाण्याचा महत्त्वाचा मार्ग) विकसित करण्यासाठी भारताने इराणशी करार केला असल्यामुळे, तो अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्याशी एकाच वेळी निर्बंधमुक्त मैत्री ठेवू शकत नाही. त्यामुळे तो रद्द करण्याइतपत दबाव भारतावर आहे.

युक्रेन आणि रशिया या दोन्ही देशांशी भारताचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक संबंध असल्यामुळे, त्या दोन राष्ट्रांमधील भीषण युद्धात भारत कोणाचीही उघड बाजू घेऊ शकत नाही. तसेच, ट्रम्प शासनाचा, व्यापार व चलन व्यवहार निर्माण होणारा स्पर्धक, ब्रिक्स समूह (व्हेनेझुएलासह) कमकुवत किंवा उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न असताना, भारत अमेरिकेला सहकार्य करू शकत नाही; कारण भारत या समूहाचा महत्त्वाचा सदस्य आहे. यामुळे भारताकडून जनतेला ज्या ठाम भूमिका आणि घोषणांची अपेक्षा होती, त्या प्रत्यक्षात दिसून येत नाहीत.

युद्धातील प्राणहानी, पशुहानी आणि शस्त्रहानीमुळे सामाजिक-सांस्कृतिक विकासाची पीछेहाट होते. हेच तत्त्व आजच्या परिस्थितीलाही तंतोतंत लागू होते. युद्ध सुरू होण्यापूर्वी आणि ते सुरू असताना धान्य, धातू आणि कारागिरी यांचा वापर वाढत्या प्रमाणात होतो. युद्ध चालविण्यासाठी प्रचंड आर्थिक संसाधने लागतात; परिणामी त्या काळात चलनवाढ (वॉरटाइम इन्फ्लेशन) मोठ्या प्रमाणावर अनुभवास येते. कोणीही जिंकला वा हरला तरी युद्ध संपल्यानंतर युद्धकाळात निर्माण झालेली सर्व प्रकारची वाढलेली मागणी अचानक कमी होते. परिणामी युद्धोत्तर काळात मंदी, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता तीव्र स्वरूपात समोर येते. हे पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतरही स्पष्टपणे दिसून आले आहे. आजही युद्धोत्तर अस्थिरता, आर्थिक मंदी आणि बेरोजगारी हे मुद्दे जगभरातील सरकारे, भांडवल बाजार आणि सामान्य समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरत आहेत.

**भारतासाठी उपाय काय?**

अशा परिस्थितीत निर्माण होणारी आर्थिक संकटे पूर्णपणे बाजारव्यवस्थेवर सोपवून देणे भारतासारख्या देशाला शक्य नाही. भारतीय संविधानाने जनतेला सन्मानजनक जीवनाचे आश्वासन मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून दिले आहे. तसेच राज्याच्या धोरणांच्या निदेशक तत्त्वांमध्ये देशातील सर्व नागरिकांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्याय मिळेल, अशी व्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी राज्यावर सोपविण्यात आली आहे. विशेषतः राज्यसंस्थेने आर्थिक विषमता दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घ्यावी, असा स्पष्ट निदेश संविधानात दिला आहे.

अनुच्छेद ३९(अ) नुसार प्रत्येक नागरिकाला पुरेशा उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे हे राज्याचे कर्तव्य आहे. अनुच्छेद ३९(ब) नुसार देशातील भौतिक उत्पादनसाधनांची मालकी आणि नियंत्रण हे सामूहिक कल्याणाच्या दृष्टीने असावे, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच अनुच्छेद ३९(क) नुसार आर्थिक व्यवस्थेच्या कार्यपद्धतीमुळे उत्पादनसाधने आणि संपत्ती यांचे केंद्रीकरण होऊन सामान्य जनतेचे नुकसान होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. ही सर्व निदेशक तत्त्वे संविधानाच्या चौथ्या भागात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली आहेत.

विकासाची प्रक्रिया या तत्त्वांच्या व्यावहारिक सीमांमध्ये सामावून घेतली गेली पाहिजे. ही तत्त्वे केवळ मार्गदर्शक स्वरूपाची नसून, कोणत्याही सरकारसाठी आणि कोणत्याही परिस्थितीत, मूलभूत निदेशक तत्त्वे आहेत, हे विशेषत्वाने अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे.